रायगड, नवी मुंबई
# राम प्रहर
◆ वर्ष १७ ◆ अंक ३३८
www.ramprahar.com
बुधवार, २५ जून २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

## अंतरंग

द्रोणागिरी नोडमधील ३१९ लाभार्थ्यांना इरादापत्राचे वाटप/२
शेतकऱ्यांना नुकसानभरपाई मिळण्यासाठी निवेदन/५
तिलक वर्माचा शतकी धमाका; इशान किशनचाही जलवा/८

## ईपीएफओची ऑटो क्लेम सेटलमेंट मर्यादा आता पाच लाख

**नवी दिल्ली :** ईपीएफओच्या सदस्यांना दिलासा देणारी बातमी समोर आली आहे. जर तुम्हाला पीएफच्या खात्यातून काही कारणांसाठी अॅडव्हान्स म्हणून पैसे काढायचे असतील, तर वाट पाहावी लागणार नाही. सरकारने ऑटो क्लेम सेटलमेंटची मर्यादा एक लाख रुपयांवरुन पाच लाख रुपये करण्यात आली आहे. केंद्रीय श्रम आणि रोजगारमंत्री मनसुख मांडवीय यांनी ही माहिती दिली. ईपीएफओने पीएफ अॅडव्हान्स क्लेम सेटलमेंटची ऑटो अप्रुव्हलची प्रक्रिया कोरोना संसर्गाच्या काळात लोकांना कमी कालावधीत पैसे उपलब्ध व्हावेत यासाठी सुरू केली होती. आतापर्यंत ऑटो क्लेम सेटलमेंटच्या दाव्यांसाठी रक्कम काढण्याची मर्यादा एक लाख रुपयांपर्यंत होती. ती आता पाच लाख रुपयांपर्यंत वाढवण्यात आली आहे. याचा फायदा आपत्कालीन स्थितीमध्ये ज्यांना पैसे हवेत त्यांच्यासाठी फायदेशीर ठरेल.

# नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळासाठी स्थानिक प्रकल्पग्रस्तांना शिबिराद्वारे प्रशिक्षण

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

प्रकल्पग्रस्तांचे दैवत लोकनेते दिवंगत दि.बा. पाटील यांच्या स्मृतीदिनानिमित्त भारतीय जनता पक्ष पनवेल पश्चिम मंडळ, लोकनेते दि.बा. पाटील २७ गाव संघर्ष समिती आणि भारत विकास ग्रुप यांच्या संयुक्त विद्यमाने लवकरच सुरू होणाऱ्या नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळात स्थानिक प्रकल्पग्रस्तांसाठी प्रशिक्षण शिबिराचे आयोजन मंगळवारी (दि. २४) करण्यात आले होते. या शिबिराचे उद्घाटन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते झाले.




उलवे नोड येथील भूमिपुत्र भवनात झालेल्या या प्रशिक्षण शिबिराला आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, 'दिबां'चे पुत्र अतुल पाटील, ज्येष्ठ नेते जे.एम. म्हात्रे, वाय.टी. देशमुख, अरुणशेठ भगत, पनवेल पश्चिम मंडळ अध्यक्ष रूपेश धुमाळ, भारत विकास ग्रुपचे उपाध्यक्ष विपिन टिक्कू, जनरल मॅनेजर मदन भोसले, सुदर्शन भालेराम आदींसह प्रकल्पग्रस्त आणि प्रशिक्षणार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या वेळी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी प्रकल्पग्रस्तांचे झुंझार नेते स्व. दि.बा. पाटील यांच्यासोबतच्या आठवणींना उजाळा दिला. **(पान २ वर..)**




**पनवेल : भूमिपुत्र, शेतकरी, प्रकल्पग्रस्तांचे कैवारी लोकनेते दिवंगत दि.बा. पाटील यांच्या १२व्या स्मृतिदिनानिमित्त पनवेल येथील संग्राम निवासस्थानी त्यांना आदरांजली वाहण्यात आली. या वेळी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, आमदार विक्रांत पाटील, ज्येष्ठ नेते जे.एम. म्हात्रे, कामगार नेते महेंद्र घरत, शिवसेनेचे उपनेते बबन पाटील, भाजपचे जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, सरचिटणीस नितीन पाटील, उपाध्यक्ष जयंत पगडे, माजी नगरसेवक अनिल भगत, मनोहर म्हात्रे, अजय बहिरा, विजय चिपळेकर, संतोष शेट्टी, प्रभाकर बहिरा, सुनील बहिरा यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी स्व. दि.बा. पाटील यांच्या प्रतिमेस पुष्पमाला अर्पण करत त्यांच्या पवित्र स्मृतीस अभिवादन केले. त्याचप्रमाणे सर्व उपस्थित मान्यवरांनी 'दिबां'च्या कार्याचा गौरव करत त्यांचे स्मरण केले.**

## महाराष्ट्र शक्तीपीठ महामार्गाला गती

### २० हजार ७८७ कोटींची तरतूद

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्याच्या पूर्वेकडील पवनार (जि.वर्धा) येथून ते पश्चिमेकडील पत्रादेवी (जि.सिंधुदुर्ग) या महाराष्ट्र-गोवा सीमेला जोडणाऱ्या महाराष्ट्र शक्तीपीठ महामार्ग (शिघ्रसंचार द्रूतगती मार्ग) प्रकल्पाला गती देण्यासाठी २० हजार ७८७ कोटी रुपयांच्या तरतुदीस मंगळवारी (दि. २४) झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. राज्यातील १२ जिल्ह्यांना जोडणारा हा द्रूतगती मार्ग ८०२.५९२ किलोमीटर लांबीचा असणार आहे.

महाराष्ट्र शक्तीपीठ महामार्ग राज्यातील वर्धा, यवतमाळ, हिंगोली, नांदेड, परभणी, बीड, लातूर, धाराशिव, सोलापूर, सांगली, कोल्हापूर व सिंधुदुर्ग या १२ जिल्ह्यांना जोडणार आहे. पुढे तो कोकण द्रूतगती महामार्गास गोवा-महाराष्ट्र सीमेवर जोडला जाणार आहे. या महामार्गामुळे राज्यातील प्रमुख शक्तीपीठे माहुर, तुळजापूर व कोल्हापूर तसेच अंबेजोगाई ही तीर्थक्षेत्रे जोडली जाणार आहेत. तसेच संतांची कर्मभूमी असलेले मराठीचे आद्यकवी अंबेजोगाईस्थित मुकूंदराज स्वामी, जोगाई देवी तसेच



१२ ज्योतिर्लिंगांपैकी दोन औंढानागनाथ व परळी वैजनाथ, महाराष्ट्राचे आराध्य पंढरपूर येथील श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर यासह कारंजा-लाड, अक्कलकोट, गाणगापूर, नरसोबाची वाडी, औदुंबर ही दत्त गुरूंची धार्मिक स्थळे जोडली जाणार आहेत. या महामार्गामुळे नागपूर ते गोवा हे १८ तासांच्या प्रवासाचे अंतर आठ तासांवर येणार आहे.

या प्रकल्पाच्या भूसंपादनाकरिता हुडकोकडून १२ हजार कोटींचे कर्ज मंजूर करण्यात आले आहे. या निधीतून सुमारे सात हजार ५०० हेक्टरचे भूसंपादन करण्यात येणार आहे. हा संपूर्ण प्रकल्प महाराष्ट्र रस्ते विकास महामंडळामार्फत राबवण्यात येणार आहे. हा महामार्ग महाराष्ट्रातील शक्तीपीठांना एकत्र जोडण्याचा प्रयत्न असून त्यातून पर्यटन, वाहतूक व ग्रामीण भागाचा विकास साधण्याचे उद्दिष्ट आहे.

## आदिवासी वसतिगृहातील विद्यार्थ्यांच्या आहार, निर्वाह, शैक्षणिक साहित्य खरेदी भत्त्यात वाढ

अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना गावाबाहेर राहून उच्च शिक्षण घेणे सुलभ व्हावे यासाठी राज्यभरात विभागीय, जिल्हा, तालुका आणि ग्रामीण स्तरावर शासकीय वसतिगृहे कार्यरत आहेत. या वसतिगृहांमध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना शासनामार्फत दिल्या जाणाऱ्या निर्वाह व आहार भत्त्यांमध्ये सुमारे दुपटीने वाढ करण्यात आली असून शैक्षणिक साहित्य खरेदी भत्त्यातही वाढ करण्याचा निर्णय मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. महागाई निर्देशांकाचा विचार करून या भत्त्यांच्या दरात सुधारणा करण्याचा निर्णय घेण्यात आला. विशेषतः वसतिगृहात राहणाऱ्या आदिवासी विद्यार्थ्यांना गेल्या काही वर्षांत कोणतीही वाढ न मिळाल्याने अडचणींना सामोरे जावे लागत होते. त्यामुळे आता सुधारित दरानुसार अधिक आर्थिक सहाय्य मिळणार आहे.

## निवडक

### वारीबद्दलच्या विधानावरून अबू आझमींनी मागितली माफी

**मुंबई :** समाजवादी पक्षाचे आमदार अबू आझमी यांनी वारीबाबत केलेल्या वादग्रस्त वक्तव्यावरून अखेर माफी मागितली आहे. 'माझ्या वक्तव्याचा विपर्यास केला गेला. त्यामुळे वारकरी समुदायाच्या धार्मिक भावना दुखावल्या असतील, तर मी माझे शब्द मागे घेतो आणि माफी मागतो. वारीच्या परंपरेचे पालन करणाऱ्या सर्व वारकरी बांधवांना मी मनापासून शुभेच्छा देतो आणि त्यांच्याबद्दल आदर व्यक्त करतो', असे आझमी यांनी म्हटले आहे.

### विमानतळासाठी अदानी करणार ५७,३३३ कोटींची गुंतवणूक

**मुंबई :** नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाची उभारणी करण्यासाठी याआधी करण्यात आलेल्या गुंतवणुकीप्रमाणेच आता अदानी समूहाकडून नव्याने गुंतवणूक केली जाणार आहे. २०२९-३०पर्यंत म्हणजेच पुढच्या पाच वर्षांत अदानींकडून या विमानतळासाठी तब्बल ५७ हजार ३३३ कोटी रुपयांची गुंतवणूक केली जाणार आहे. विमानतळाच्या विकासाशी निगडित पहिल्या तीन टप्प्यांसाठी प्रामुख्याने ही गुंतवणूक वापरली जाणार आहे.

## कधीपर्यंत हवेत बाण सोडत राहणार?

### मुख्यमंत्री फडणवीसांचा राहुल गांधींना सवाल

**मुंबई : प्रतिनिधी**

गेल्या काही दिवसांपासून काँग्रेसचे नेते तथा लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी हे २०२४च्या महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या मतदानामध्ये घोळ झाल्याचा आरोप करत आहेत. त्यांनी आता आणखी एक दावा करत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मतदारसंघात अचानक मतदार वाढल्याचा दावा केला आहे. या आरोपाला मुख्यमंत्री फडणवीस यांनी प्रत्युत्तर दिले आहे.

राहुल गांधी यांनी एक्सवर केलेल्या पोस्टमध्ये म्हटले आहे की, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मतदारसंघात केवळ पाच महिन्यांत मतदारयादीत आठ टक्के मतांची वाढ झाली. काही मतदान केंद्रांवर २० टक्के ते ५० टक्केपर्यंत मतांची वाढ झाल्याचे समोर आले.

यावर मुख्यमंत्री फडणवीस यांनी ट्वीट करत म्हटलेय की, झूठ बोले कौवा काटे, काले कौवे से डरियो! राहुल गांधी, महाराष्ट्रातील मोठ्या पराभवामुळे तुमचे दुःख



दिवसेंदिवस वाढत आहे हे मी मान्य करतो, पण तुम्ही कधीपर्यंत हवेत बाण सोडत राहणार आहात? तुमच्या माहितीसाठी महाराष्ट्रात २५पेक्षा जास्त मतदारसंघ आहेत, जिथे लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीच्या दरम्यान आठ टक्क्यांपेक्षा जास्त मतदार वाढले आहेत आणि काँग्रेसने अनेक ठिकाणी विजय मिळवला आहे. माझ्या मतदारसंघाला लागून असलेल्या पश्चिम नागपूर मतदारसंघात सात टक्के मतदारांची (२७,०६५) वाढ झाली. येथून काँग्रेस उमेदवार विकास ठाकरे यांनी निवडणूक जिंकली आहे. उत्तर नागपुरात मतदारांमध्ये सात टक्के (२९,३४८) वाढ झाली आणि काँग्रेसचे नितीन राऊत विजयी झाले. पुण्याच्या वडगाव शेरी येथे १० टक्के (५०,९११) मतदारांची वाढ झाली आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे बापूसाहेब पठारे विजयी झाले. मालाडमध्ये ११ टक्के (३८,६२५) मतदारांची वाढ झाली आणि काँग्रेसचे अस्लम शेख विजयी झाले. मुंब्रामध्ये मतदारांमध्ये नऊ टक्के (४६,०४१) वाढ झाली आणि राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे जितेंद्र आव्हाड विजयी झाले आहेत, असेही मुख्यमंत्र्यांनी राहुल यांच्या निदर्शनास आणून दिले.

### निवडणूक आयोगाकडून राहुलबाबांना थेट चर्चेसाठी आमंत्रण

**मुंबई :** महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या निकालानंतर काँग्रेसचे नेते आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी हे मतदारयादीतील अनियमितता आणि इतर आरोप करत आहेत. त्यामुळे निवडणूक आयोगाने राहुल गांधींना ई-मेल आणि पत्राद्वारे थेट चर्चेसाठी आमंत्रण पाठवले आहे. यासोबतच त्यांना त्यांच्या सोयीनुसार तारीख आणि वेळ निश्चित करून आयोगाला कळवण्यास सांगण्यात आले आहे.

राहुल गांधींना चर्चेसाठी लिहिलेल्या पत्रात निवडणूक आयोगाने म्हटले आहे की, आम्ही संसदेने पारित केलेल्या कायद्यांनुसार आणि त्यानुसार बनवलेल्या नियमांनुसार कोणतीही निवडणूक घेतो. यामुळे निवडणुकीत हेराफेरीची चर्चा पूर्णपणे चुकीची आहे. महाराष्ट्र निवडणुकीत केलेल्या हेराफेरीच्या आरोपांना आम्ही २४ डिसेंबर २०२४ रोजी लेखी स्वरूपात सविस्तर उत्तरे दिली आहेत. आयोग आता काँग्रेस पक्षासोबतच्या बैठकीत राहुल गांधींना प्रमुखतेने आमंत्रित करू इच्छित आहे, जेणेकरून निवडणुकीशी संबंधित त्यांच्या शंका दूर करता येतील.

## अलिबागमधील वरसोली येथे लॉजिंगच्या नावाखाली कुंटणखाना

### दोघांना अटक, पीडितेची मुक्तता

**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबाग तालुक्यातील वरसोली येथे सुरू असलेल्या कुंटणखान्याचा अलिबाग पोलिसांनी पर्दाफाश केला आहे. येथील लोटस लॉजिंगमध्ये वेश्याव्यवसाय चालविणाऱ्या दोघांना अलिबाग पोलिसांनी रंगेहाथ पकडले. दोघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे, तर वेश्या व्यवसायासाठी आणलेल्या पीडितेला ताब्यात घेत महिला सुधारगृहात पाठविण्यात आले आहे.

वरसोली येथील लोटस लॉजिंगवर अवैधरीत्या देहविक्रीचा व्यवसाय चालत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार एक पथक तयार करीत सोमवारी (दि. २३) संध्याकाळी कारवाई करण्यात आली.

एक बनावट ग्राहक पाठवून देहविक्रीचा व्यवसाय चालू असल्याची खात्री झाल्यानंतर पोलिसांना सांकेतिक इशारा मिळाला. त्यानंतर तत्काळ पोलीस पथकाने धाड टाकून तेथे वेश्या व्यवसायासाठी आलेल्या पीडित मुलीला मुक्त केले. या प्रकरणी राजेश रामलखन चौपाल व जोत्स्ना दास यांच्या विरोधात अलिबाग पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहितेतील अनैतिक व्यापार प्रतिबंधक कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला. या दोन्ही आरोपींना पोलिसांनी अटक केली.

पोलीस अधीक्षक आँचल दलाल, अपर पोलीस अधीक्षक अभिजीत शिवथरे यांच्या मार्गदर्शनाखाली अलिबाग पोलीस ठाण्याचे निरीक्षक किशोर साळे व त्यांच्या पथकाने ही कामगिरी बजावली.

## उरणमधील रानसई धरण ओव्हरफ्लो



**उरण : प्रतिनिधी**

उरण तालुक्याला पाणीपुरवठा करणारे रानसई धरण तुडूंब भरले असून मंगळवारी (दि. २४) सकाळी ८ वाजता या धरणाचे पाणी ओसंडून वाहू लागले आहे. त्यामुळे उरणचा वर्षभराचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटला आहे.

मागील वर्षी रानसई धरण १६ जुलै रोजी भरले होते. यंदा वरुणराजाने लवकरच हजेरी लावल्याने तब्बल २२ दिवस आधीच हे धरण भरून वाहू लागले आहे. या धरणातून उरण तालुक्यातील विविध औद्योगिक प्रकल्पांसह २५ ग्रामपंचायत हद्दीतील गावांसह उरण नगर परिषद क्षेत्रात पाणीपुरवठा केला जातो. हे धरण भरल्याने पाणीकपात संपुष्टात आली. त्यामुळे नागरिकांमध्ये समाधान व्यक्त होत आहे.

*मागील वर्षाच्या तुलनेत यंदा पावसाला मे महिन्यातच सुरुवात झाली. चांगल्या पावसामुळे रानसई धरण लवकरच तुडुंब भरले असून पाणीकपातीचा प्रश्न निकाली निघाला आहे.*

**-ग्यानदेव सोनवणे,** एमआयडीसी अभियंता, उरण

## पुलावरून दुचाकीस्वार गेला नदीत वाहून

**कुडाळ : प्रतिनिधी**

कुडाळ तालुक्यातील वसोली येथे कर्ली नदीवरील कुत्रेकोंड पुलावरून पाणी वाहत असताना दुचाकीस्वार वाहून गेला, तर त्याच्यासोबत असलेला सहकारी सुदैवाने बचावला.

माणगाव येथून दुचाकीने दोन युवक शिवापूरला जात होते. दुचाकी वसोली कुत्रेकोंड येथे आली असता त्यांनी पुलावरील पाण्याचा अंदाज न घेता पुढे जाण्याचा प्रयत्न केला. प्रवाह जास्त असल्यामुळे दुचाकीसोबत एक तरुण खाली वाहत गेला, तर त्याच्यासोबत सहकारी सुदैवाने बचावला. त्याने आरडाओरड केल्यावर ग्रामस्थांनी शोधाशोध केली, मात्र वाहून गेलेला तरुण सापडला नाही.

## 'आषाढी'साठी रायगडातून एसटीच्या ६० जादा बसेस

**अलिबाग : प्रतिनिधी**

आषाढी एकादशीनिमित्त विठूरायाच्या दर्शनासाठी पंढरपूरला जाणाऱ्या भाविकांसाठी एसटी महामंडळातर्फे विशेष जादा गाड्यांची व्यवस्था करण्यात आली आहे. रायगड जिल्ह्यातील आठ आगारांमधून ६० जादा बसेस पंढरपूरसाठी सोडण्यात येणार असल्याची माहिती एसटीचे विभाग नियंत्रक दीपक घोडे यांनी दिली.

दरवर्षी रायगडातून हजारो भाविक आषाढी एकादशीला पांडुरंगाचे दर्शन घेण्यासाठी जात असतात. अनेकदा खासगी बसेस करून, तर कधी सार्वजनिक वाहनाने हे भाविक पंढरपूर गाठत असतात. खासगी वाहनातून जाणे अनेकदा खर्चिक असते. त्यामुळे भाविकांची गैरसोय टाळण्यासाठी दरवर्षी राज्य एसटी महामंडळाकडून आषाढीनिमित्त पंढरपूरला जाणाऱ्या भक्तांसाठी जादा बसेस सोडण्याचे नियोजन करण्यात येते.



या वेळी जादा बसेससाठी काही सवलतीही देण्यात आल्या आहेत. जर एखाद्या गावातील ४० किंवा त्याहून जास्त भाविकांनी एकत्र बुकिंग केले, तर त्यांच्यासाठी स्वस्त दरात गावातूनच बस सोडण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे पंढरपूरला जाउन दर्शन झाल्यानंतर या भाविकांना पुन्हा त्याच बसने आपल्या गावात सोडण्याची व्यवस्था करण्यात येणार आहे. यंदा ६ जुलै रोजी आषाढी एकादशी असून त्याच्या काही दिवस आधीच बसेस सोडण्यात येणार आहेत.

### महिला, ज्येष्ठांना सवलत कायम

आषाढी एकादशीनिमित्त पंढरपूला जाण्यासाठी एसटी बसचे ग्रुप बुकिंग करताना महिलांना एसटी प्रवासात तिकीट दरामध्ये असणारी ५० टक्के सवलत कायम ठेवण्यात आली आहे. त्याचप्रमाणे ७५ वर्षांपेक्षा जास्त वय असणाऱ्या ज्येष्ठांना मोफत प्रवास सवलत असणार आहे. या सवलतीचा भाविकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन विभाग नियंत्रक दीपक घोडे यांनी केले आहे.

याबाबत जिल्हा वाहतूक नियंत्रक दीपक घोडे यांनी सांगितले की, रायगड जिल्ह्यातून एकूण ६० बसेस पंढरपूरसाठी सोडण्यात येणार आहेत. सध्या एकही ग्रुप बुकिंग आलेले नाही, पण तसे बुकिंग केल्यास बस उपलब्ध करून देण्यात येईल. भाविकांना या सुविधेचा लाभ घेऊन पंढरपूरला दर्शनासाठी जाता येईल.

# द्रोणागिरी नोडमधील ३१९ लाभार्थ्यांना इरादापत्राचे वाटप



मुंबई,: रामप्रहर वृत्त

उरण तालुक्यातील द्रोणागिरी नोडमधील ३१९ पात्र लाभार्थ्यांना सिडकोच्या १२.५% योजनेअंतर्गत देय भूखंडाच्या इरादा पत्राचे वाटप उपमुख्यमंत्री, एकनाथ शिंदे यांच्या हस्ते प्रातिनिधिक स्वरूपात इरादापत्रांचे वाटप करण्यात आले.

सिडकोतर्फे सदर भूखंडांसाठी सोडतघेण्याचा ऐतिहासिक निर्णय दिनांक ११ जून २०२५ रोजी संचालक मंडळाच्या बैठकीत घेण्यात आला.द्रोणागिरी नोडमधील प्रकल्पबाधितांसाठी शेवटची सोडत सन २००७ मध्ये घेण्यात आली होती.त्या नंतर मंगळावार ( दि. २४ ) रोजी झालेल्या या सोडती वेळी सिडकोचे उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल, उपमुख्यमंत्री कार्यालयाचे अप्पर मुख्य सचिव नवीन सोना, सह-व्यवस्थापकीय संचालक, गणेश देशमुख, सिडको, मुख्यभूमी व भूमापन अधिकारी, सिडको, . संदीप निचित आणि मुख्य भूमी व भूमापन अधिकारी, सिडको, दिपक आकडे आणि पात्र लाभार्थी उपस्थित होते.

रायगड जिल्ह्यातील उरण तालुक्यातील द्रोणागिरी नोडमधील ३१९ पात्र लाभार्थ्यांना मुख्यमंत्री,देवेंद्र फडणवीस यांनी इरादापत्र देण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला. त्यानंतर मंत्रालयातील दालनात .उपमुख्यमंत्री, एकनाथ शिंदे यांच्या हस्ते या लाभार्थ्यांना प्रतिनिधीक स्वरूपात इरादापत्रांचे वाटपकरण्यात आले.

ठाणे, नवी मुंबई, पनवेल आणि उरण तालुक्यातील ९५ गावातील जमिनी संपादित करताना त्यांना१२.५% योजनेअंतर्गत भूखंड वाटप करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. या योजनेअंतर्गत ९४ टक्केलाभार्थ्यांना भूखंडांचे वितरण पूर्ण झाले होते. तर उर्वरित ५.५९% भूखंडाचे वाटप शिल्लक होते. त्यामुळे या नोडमधील ३१९ पात्र लाभार्थ्यांना १२.५% भूखंड वाटप करण्याचा निर्णय मुख्यमंत्री देवेंद्रफडणवीस यांनी घेतला.त्यानुसार या पात्र लाभार्थ्यांना १ लाख ९० हजार चौरस मीटर भूखंड क्षेत्राचे वाटप करण्याचे निश्चितकरण्यात आले आहे.

# जिल्हाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत ड्रोन व सीसीटीव्ही दुरूस्ती प्रशिक्षण

**रायगड: रामप्रहर वृत्त**

जिल्हा उद्योग केंद्र, रायगड-अलिबाग व महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र, रायगड यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ड्रोन आधारित प्रणाली व सीसीटीव्ही कॅमेरा देखभाल आणि दुरुस्ती प्रशिक्षण कार्यक्रमाचा शुभारंभ आज जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्या प्रमुख उपस्थितीत जिल्हा उद्योग केंद्र, रायगड-अलिबाग येथे संपन्न झाला.

कार्यक्रमाला जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक, बँक ऑफ इंडिया,विजयकुमार कुलकर्णी,महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, जी.एस. हरळय्या, व्यवस्थापक, बँक ऑफ बडोदा चैतन्य मुड,जिल्हा समन्वयक, स्टेट बँक ऑफ इंडिया संजय गोळे उपस्थित होते.

जिल्हाधिकारी जावळे यांनी यावेळी बोलताना सांगितले की, जिल्ह्यातील कृषी व्यवसायासाठी ड्रोन तंत्रज्ञानाचा वापर औषध फवारणी यासारख्या उपक्रमांद्वारे वाढविण्यात येणार आहे त्यासाठी शेतकऱ्यांचा मेळावा घेऊन त्यांना द्रोणच्या माध्यमातून औषध फवारणीचे फायदे समजाऊन भविष्यात त्याचा उपयोग करून आंबा पिकाचे उत्पन्न वाढ होईल यावर भर दिला जाईल.

सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून जिल्ह्यात ठीक ठिकाणी सी सी टी व्ही कॅमेरे बसविण्यात आले आहेत.आपला जिल्हा



निसर्गरम्य असल्यामुळे पर्यटनाला चालना देणारा आहे त्यामुळे लाखो पर्यटक जिल्ह्यात येत असतात.त्यांना सुंदर आणि सुरक्षित समुद्र किनारे मिळाले तर पर्यटनास आणखी चालना मिळेल यासाठी सी सी टी व्ही कॅमेरे दुरुस्ती प्रशिक्षणाच्या माध्यमातून तरुणांना रोजगाराच्या संधी मिळणार आहेत.

तसेच ड्रोन आणि सीसीटीव्ही क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर उद्योग संधी असून, जिल्हा प्रशासन या क्षेत्रांतील प्रशिक्षण व प्रोत्साहन यावर भर देत आहे असेही त्यांनी यावेळी सांगितले.

प्रास्ताविकात बोलताना जी.एस. हरळय्या यांनी सांगितले की, रायगडसारख्या पर्यटन जिल्ह्यात ड्रोन आधारित उद्योग व्यवसायासाठी भरपूर संधी आहेत.

तसेच सीसीटीव्ही कॅमेऱ्यांच्या देखभाल व दुरुस्तीसाठीही भरपूर रोजगाराच्या संधी उपलब्ध आहेत. या प्रशिक्षणामुळे बेरोजगार तरुणांना स्वउद्योग सुरू करण्यास मदत होईल.यावेळी मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम व पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रम अंतर्गत लाभार्थ्यांना मंजूर झालेल्या फूड व्हॅन वाहनांचे हस्तांतरणही जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्या हस्ते करण्यात आले.

## विना नोंदणी व नोंदणी क्रमांक न टाकलेले ट्रॅक्टर, ट्रॉलीवर धडक कारवाई

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील ग्रामीण भागात अनेक ट्रॅक्टर व ट्रॉली विना नोंदणी अथवा विना नंबर प्लेट व वैध कागदपत्रांशिवाय धावत असल्याने प्रादेशिक परिवहन कार्यालय पनवेललाच्या चार वायुवेग पथकांनी एकाच वेळी धडक कारवाई करून एक लाख ९५ हजार रुपये दंड ठोठावला व एक लाख ५० हजार रुपये दंडाची रक्कम वसूल केली.

कर्जत आणि आजूबाजूला अनेक ट्रॅक्टर व ट्रॉली विना नोंदणी अथवा विना नंबर प्लेट व वैध कागदपत्रांशिवाय धावत असल्याची तक्रार असल्याने प्रादेशिक परिवहन कार्यालय पनवेल चे चार वायूवेग पथकांनी एकाच वेळी कर्जत तसेच हुमगाव परिसरात अनेक विना नोंदणी, नोंदणी क्रमांक न टाकलेले ट्रॅक्टर व ट्रॉली वर धडक कार्यवाही केली. शेती वापरासाठी दाखवून नोंदणी करून प्रत्यक्षात व्यवसायिक



वापर करणारे ट्रॅक्टर ट्रॉली धारकांची त्या मुळे चांगलीच पंचायत होऊन पळापळ झाली. ही कारवाई मोटार वाहन निरीक्षक विकास माळवे, मोटार वाहन निरीक्षक महेश माने, मोटार वाहन निरीक्षक सुयोग पाटील, सहाय्यक मोटार वाहन निरीक्षक मल्हार शिंदे, सहाय्यक मोटर वाहन निरीक्षक अशोक वारे, सहाय्यक मोटर वाहन निरीक्षक प्रीती पवार आदींनी केली.

काही ट्रॅक्टर व ट्रॉलींची आवश्यक कागद पत्रे संपलेले असल्याने सदर वाहनांवर दंडात्मक कारवाही करून कर्जत पोलिस ठाणे मध्ये उभे करून दंड भरून घेण्यात आला. या कारवाही मध्ये सुमारे शंभरच्या वर वाहने तपासण्यात आली. अक्षरश : गॅरेज मध्ये कामे करत असलेले किंवा रस्त्याच्या कडील घरा समोर उभे असलेले ट्रॅक्टर वाहने सुद्धा अधिकाऱ्यांनी तपासली. या कारवाई मध्ये एक लाख ९५ हजार इतका दंड ठोठावला व १ लाख ५० हजार रुपये वसूल करण्यात आले. या कारवाईमुळे शेतकरी कामा साठी वापरण्यात येणाऱ्या ट्रॅक्टर धारकांची काहीशी गैर सोय झाली.

## आंतरपरिमंडलीय नाट्य स्पर्धेत भांडुपचे 'कुसुम मनोहर लेले' द्वितीय

**मुंबई: रामप्रहर वृत्त**

महावितरणच्या कोंकण प्रादेशिक आंतरपरिमंडलीय नाटय स्पर्धेत भांडुप परिमंडलाचे 'कुसुम मनोहर लेले' या नाटकाने द्वितीय स्थान पटकाविले आहे. तर रत्नागिरीचे नाटक आवर्त; हे नाटक विजेते ठरले आहे. २० जून रोजी छत्रपति संभाजी राजे नाट्यमंदिर येथे ही स्पर्धा उत्साहात पार पडली.

महावितरणचे संचालक (मा सं) राजेंद्र पवार यांच्या शुभहस्ते नाट्य स्पर्धेतील विजेत्यांना पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. मुख्य अभियंता डॉ. मनीष वाठ, जळगावचे मुख्य अभियंता इब्राहीम मुलाणी, महाव्यवस्थापक (मा सं) राजेंद्र पांडे, यांच्यासह कोंकण प्रादेशिक विभागातील विविध परिमंडल कार्यालयातील आलेले अधिकारी, अभियंते, कर्मचारी व नाट्य रसिकांची मांदियाळी यावेळी उपस्थित होती.

### भांडुप परिमंडळाला मिळालेली बक्षिसे

***अभिनय स्त्री प्रथम- सौ. रूपाली पाटील, नाट्य निर्मिती- द्वितीय , दिग्दर्शक द्वितीय- चंद्रमणी मेश्राम, रंगभूषा व वेशभूषा- द्वितीय, अभिनय पुरुष द्वितीय- देवव्रत पवार, उत्तेजनार्थ अभिनय पुरुष- चंद्रमणी मेश्राम, प्रकाश योजना - द्वितीय.***



## मुंढाणीत जबरी चोरी, सोन्या-चांदीचे दागिने व रोकड चोरट्याने लांबवली

**पाली : प्रतिनिधी**

रायगडच्या पेण तालुक्यातील मुंढाणी, पोस्ट बेणसे येथील सुभाष घासे यांच्या घरात जबरी चोरी झाल्याची घटना नुकतीच समोर आली आहे. बंद घरात स्लाईडिंगच्या खिडकीतून शिरून कपाटाचे कुलूप तोडून ५ तोळे सोने व ५ हजाराची रोकड लंपास केली आहे. याबाबत सुभाष घासे यांनी चोरीची तक्रार नागोठणे पोलीसात दिली आहे. मुंढाणी गावातील ही नववी चोरी असून या चोरीच्या वाढत्या घटनांनी नागरिक भयभीत झाले आहेत. चोरट्यांच्या मुसक्या आवळण्याचे पोलिसांपुढे मोठे आव्हान उभे ठाकले आहे.

सुभाष घासे यांनी पोलिसात दिलेल्या तक्रारीनुसार ते दि (२०) शुक्रवार रोजी त्यांच्या पत्नी व मुलाला घेऊन त्यांच्या सुरक्षा नगर येथील लहान भावाकडे सकाळी घराला कुलूप लावून गेले होते. रात्री साडेअकरा



वाजता ते घरी परतले. सकाळी दि.(२१ )रोजी मुलगा युवराज याने पैसे मागितल्याने सुभाष घासे हे बेडरूममध्ये असलेल्या कपाटातुन पैसे काढण्यास गेले असता कपाटाचा लॉकर तुटलेल्या अवस्थेत दिसून आला.पैसे व दागिन्यांचा शोध घेतला असता कपाटात न आढळल्याने चोरी झाल्याचे त्यांच्या लक्षात आले व यांच्यासह त्यांची पत्नी व मुलांना मोठा धक्का बसला.

चोरीस गेलेल्या ऐवजात २ तोळे सोन्याचा नेकलेस, दीड तोळ्याची सोन्याची चैन, १ अर्धा तोळे सोन्याची चैन, कानातले अर्धा तोळे सोन्याचे झुमके, सोन्याची नाकातली नथ , व ५ हजार रुपयांची रोख रक्कम अशी आजच्या बाजारभावात ५ लाख रुपयांचे दागिने चोरीला गेली आहे. यासंबधित घासे यांनी पोलिसात तक्रार दिली आहे. चोरीला गेलेले सोने चांदीचे दागिने व रोख रक्कम या संबंधित कोणी नागरिक अथवा ज्वेलर्स दुकानदार यांनी माहिती दिल्यास त्यास नाव गुप्त ठेऊन योग्य ते बक्षीस दिले जाईल असे दिनेश घासे, मोबाईल नंबर (७७०९१७७७६७) यांनी सांगितले.



**कळंबोली : जनसंघाचे संस्थापक डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांच्या स्मृतिदिनानिमित्त माजी नगरसेवक राजू शर्मा यांच्या कार्यालयात डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांच्या प्रतिमेला पुष्पहार वाहून अभिवादन करण्यात आले. या वेळी राजू शर्मा, भाजपचे सरचिटणीस दिलीप बिष्ट, संजय दोडके, विलास किठे आदी उपस्थित होते.**

वाचनीय बातम्या आणि जाहिरातींसाठी वाचा रामप्रहर

# नवी मुंबई विमानतळावरून सप्टेंबरपासून उड्डाण

### *खासदार श्रीरंग बारणे यांची आढावा बैठकीत माहिती*

**पनवेल : वार्ताहर**

मावळ लोकसभा मतदारसंघातील पनवेल येथील लोकनेते दि.बा.पाटील आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या कामाला वेग आला आहे. इंटर टर्मिनल कनेक्टिव्हिटी असणारा भारतातील हे पहिलेच विमानतळ असणार आहे. वार्षिक दोन कोटी प्रवासी क्षमता असलेले टर्मिनल एक सप्टेंबर २०२५ पासून सुरू होईल. येथून आंतरराज्यीय विमानसेवा प्राथमिक स्थरावर सुरू होणार



असल्याची माहिती शिवसेना खासदार श्रीरंग बारणे यांनी दिली.

मावळचे खासदार श्रीरंग बारणे यांनी मंगळवारी प्रस्तावित नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला भेट दिली. कामाचा संपूर्ण आढावा घेतला. अधिकाऱ्यांना कामाला गती देण्याच्या सूचना दिल्या. अदानी एरपोर्ट विभागाच्या सीईओ मिनल नाईक, सिडको प्रोजक्ट मॅनेजर गीता पिल्ले यांनी विमानतळाच्या कामाचे सादरीकरण दिले.

या वेळी शिवसेना जिल्हा प्रमुख रामदास शेवाळे, जिल्हा प्रमुख अतुल भगत, शिवसेना उपजिल्हा प्रमुख विनोद साबळे, शिवसेना पनवेल महानगर प्रमुख प्रथमेश सोमण, पनवेल शिवसेना तालुका प्रमुख रघुनाथ पाटील, उरण तालुका प्रमुख दिपक ठाकूर, शिवसेना शहर प्रमुख प्रसाद परब, तुकाराम सरख, सुनिल गोवारी, प्रसाद सोनवणे, शिवसेना उपमहानगर प्रमुख महेश सावंत, शिवसेना संपर्क प्रमुख मंगेश राणवडे, शिवसेना महिला उरण विधानसभा जिल्हा संघटिका मेधाताई दमडे व पक्षाचे प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते.

### दुखवटा

## शांताराम म्हात्रे

**उरण :** कामगार वसाहत मध्ये राहणारे शांताराम कृष्णा म्हात्रे यांचे



गुरुवार ( दि.१९ ) रोजी दु:खद निधनझाले.मृत्यू समयी त्यांचे वय ७१ वर्षे होते.त्यांच्या पश्यात पत्नी, दोन मुलगे ,एक मुलगी असा परिवार होता.त्यांचे दशक्रिया विधी शनिवार ( दि. २८) जून रोजी श्रीक्षेत्र माणकेश्वर येथे होणार असून उत्तरकार्य ( तेरावे)मंगळवार ( दि. १ )जुलै रोजी रिद्धीसिद्धी अपार्टमेंटविनायक,रानवड , केगाव तालुका उरण येथे होणार आहे .

पान १ वरून

## नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळासाठी स्थानिक प्रकल्पग्रस्तांना शिबिराद्वारे प्रशिक्षण

ते म्हणाले, सिडकोच्या स्थापनेपासूनच लोकनेते दि.बा. पाटीलसाहेबांनी जमीन बचाव समिती या नावाने संघर्षाला सुरुवात केली होती. या संघर्षामध्ये १९७७ सालापासून मी साहेबांबरोबर काम केले याचा मला अभिमान आहे.

आमदार प्रशांत ठाकूर यांनी सांगितले की, प्रकल्पग्रस्तांचे दैवत स्व. दि.बा. पाटीलसाहेबांमुळे आणि लढवय्या हुतात्म्यांमुळे या भूमीला एक वेगळा इतिहास लाभला आहे. 'दिबां'नी प्रकल्पग्रस्तांसाठी लढा दिला, सामाजिक विषयांसाठी आंदोलन केली. आपल्या परिसरात साकारत असलेल्या आंतरराष्ट्रीय विमानतळात एवढ्या मोठ्या प्रमाणात नोकरीच्या संधी निर्माण होत असतील, तर त्याचा फायदा इथल्या प्रकल्पग्रस्तांना झालाच पाहिजे, अशी आमची आग्रही भूमिका आहे.

प्रकल्पग्रस्तांचे नेते दि.बा. पाटील यांचेच नाव नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला दिले जाणार आहे, पण काही जण मुद्दाम संभ्रम पसरवण्याचे काम करीत आहेत, असे सांगत आमदार महेश बालदी यांनी विरोधकांचा समाचार घेतला. त्यांनी शेकापचे माजी आमदार बाळाराम पाटील यांचे नाव घेत याच महोदयांनी तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या बैठकीत विमानतळाच्या एखाद्या टर्मिनलला लोकनेते दि.बा. पाटील यांचे नाव द्यावे, अशी भूमिका घेतली होती. आम्ही त्या बैठकीला उपस्थित होतो. मी आणि माजी आमदार गणपत गायकवाड यांनी त्या बैठकीत उठून उभे राहत विमानतळाला नाव दि.बा.पाटीलसाहेबांचेच द्यावे लागेल, असे उद्धव ठाकरेंना ठणकावून सांगितले. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला 'दिबां'चे नाव दिले जाईल व हे यश जर कोणाचे असेल, तर ते आपण जो लढा उभारला त्याचे आहे, असेही ते म्हणाले.

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला प्रकल्पग्रस्तांचे नेते स्व. दि.बा. पाटीलसाहेबांचे नाव दिले जाईल याबाबत माझ्या मनात तीळमात्र शंका नाहीये, असा विश्वास 'दिबां'चे पुत्र अतुल पाटील यांनी व्यक्त केला.

या प्रशिक्षण शिबिरास नवी मुंबई महापालिकेचे माजी विरोधी पक्षनेते दशरथ भगत, नंदराज मुंगाजी, गव्हाण ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच विजय घरत, वहाळ ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच अमर म्हात्रे, माजी नगरसेवक गणेश कडू, योगिता भगत, निकिता खारकर, प्रवीण खंडागळे, वितेश म्हात्रे, धीरज ओवळेकर, सचिन घरत, प्रिया शिंदे, जितेंद्र म्हात्रे, सी.एल. ठाकूर, विनोद म्हात्रे, राजेश गायकर, सीमा घरत यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.



## अवधूत येरफुल्ले

**माथेरान :** माथेरान गिरीस्थान नगरपरिषदेचे माजी नगरसेवक अवधूत येरफुल्ले यांचे प्रदीर्घ आजाराने निधन झाले. १९९१ मध्ये माथेरान नगरपरिषदेत प्रवेश करताना




शिवसेना पक्षाचा पहिला नगरसेवक होण्याचा मान मिळविला. तसेच माथेरान शिवसेना शहर शाखेचे उपशहरप्रमुख म्हणून देखील त्यांनी अनेक वर्षे कार्य केले.त्यांच्या पश्चात पत्नी,दोन मुली, मुलगा,सून,नातवंडे असा परिवार आहे.

# तापाच्या रुग्णसंख्येत वाढ

## ◆ पनवेलमध्ये महिनाभरात ३,७९४ रुग्णांनी नोंद

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल महापालिका क्षेत्रात महिन्याभरात ३,७९४ जणांना ताप, डोकेदुखी, सर्दी व खोकला या आजाराच्या रुग्णांची नोंद झाली असून हा आजार संसर्गजन्य असल्याने घरात स्वच्छता आणि गर्दीत जाणे टाळा अशा सूचना महापालिकेच्या आरोग्य विभागाने नागरिकांसाठी दिल्या आहेत. नागरिकांच्या सोयीसाठी महापालिकेने रविवारीसुद्धा नागरी आरोग्य केंद्र सुरू ठेवले आहेत.



मागील वर्षी २३ मे ते २३ जून यादरम्यान पनवेल महापालिका क्षेत्रात ३,६४९ रुग्ण या आजाराचे आढळले होते. मागील वर्षीपेक्षा याच महिन्यात १४५ रुग्ण वाढल्याने महापालिकेचे आयुक्त मंगेश चितळे यांनी यासंदर्भात आरोग्य विभागाची नुकतीच बैठक घेतली. ताप, सर्दी, खोकला किंवा इतर लक्षणे आढळल्यास तातडीने नागरी आरोग्य केंद्राशी संपर्क साधावा. तसेच साथीचे रुग्ण आढळल्यास महापालिकेच्या idsppanvelc orporation@gmail. com या ई-मेलवर माहिती द्यावी, असे आवाहन महापालिकेचे साथरोग तज्ज्ञ डॉ. आकाश ठसाळे यांनी केले आहे.

पालिकेचे आवाहन : ताप, सर्दी आदी आजार टाळण्यासाठी उकळलेले पाणी प्यावे, स्वच्छ अन्न सेवन करावे, डासांची उत्पत्ती रोखण्यासाठी साचलेले पाणी हटवावे व पाण्याची टाकी निर्जंतुक करावी. फुलदाणी, वॉटरकूलर यामधील पाणी आठवड्यातून एकदा काढून कोरडे ठेवावे, असे आवाहन महापालिकेचे वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. आनंद गोसावी यांनी केले.



**कळंबोली : भाजप कळंबोली मंडळामध्ये अध्यक्ष अमर पाटील यांच्या नेतृत्वाखाली सर्व बूथवर थोर नेते डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांच्या पुण्यतिथीनिमित्त अभिवादन करण्यात आले.**

# चांभार्लीत आमदार महेश बालदी यांच्या निधीतून रस्त्याचे भूमिपूजन



**मोहोपाडा : प्रतिनिधी**

चांभार्ली मुख्य रस्ता ते ग्रामपंचायत कार्यालयाकडे जाणारा आरसीसी रस्त्याचे (निधी ७० लाख) भूमिपूजन मंगळवारी (दि.२४) हभप तुकाराम महाराज मुंढे, माजी सरपंच कृष्णा पारंगे, माजी सरपंच अशोक मुंढे, हभप बंधुराज महाराज जांभळे, सरपंच प्रतीप पाटील, उपसरपंच स्वप्निल जांभळे यांच्या हस्ते करण्यात आले.

या वेळी तालुका सरचिटणीस प्रवीण जांभळे, अनंता जांभळे, दत्ता जांभळे, सदस्या प्रिया पाटील, सदस्य समीर पाटील, कुंडलिक जांभळे, ज्ञानेश्वर मुंढे, उमेश मुंढे, नारायण जांभळे, लहू जांभळे, रघुनाथ पाटील, आकाश जुईकर, चेतन जाधव, कांता मुंढे, पुंडलिक पवार, नारायण पवार, आनंद मुंढे, अमित मुंढे, विजय मुंढे, ज्ञानेश्वर जांभळे, प्रमोद जांभळे, धनाजी जांभळे, मुरली जांभळे, प्रकाश जांभळे, तारामती जांभळे, सरिता जांभळे, दर्शना मुंढे , प्रिया जांभळे, वैशाली जांभळे, राणी जांभळे, रवी जांभळे,भगवान जांभळे, गणेश पवार, प्रणित मुंढे, अमित पाटील यांच्यासह ग्रामस्थ व कार्यकर्ते प्रणित मुंढे, अमित पाटील उपस्थित होते.

या वेळी खालापूर तालुका सरचिटणीस प्रवीण जांभळे यांनी आमदार महेश बालदी यांचे चांभार्ली ग्रामपंचायत अंतर्गत भरघोस निधी दिल्याबद्दल आभार मानले व यापुढेही विकासाची कामे आमदार साहेबांच्या मार्फत होणार आहेत, असे ग्रामस्थांना आश्वासित केले.

# विद्यार्थिनीला मोबाईल दिला भेट

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल एज्युकेशन सोसायटीतील विद्यार्थीनीला मोबाईल भेट देण्याच्या शब्द गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कारप्रसंगी पनवेल शहर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक नितीन ठाकरे यांनी दिला होता. तो आज पाळून अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत तिला मोबाईल भेट देण्यात आला.

माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, आमदार विक्रांत पाटील, भाजप नेते जे. एम. म्हात्रे आदी मान्यवरांच्या हस्ते पनवेल एज्युकेशन सोसायटीतील सहावीच्या इयत्तेत शिकणारी विद्यार्थिनी सनम अजीज खान हिला मोबाईल फोन भेट देण्यात आला. या वेळी पनवेल शहर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन ठाकरे, शिक्षक असीम पटेल, माधव शेवाळे आदी या वेळी उपस्थित होते.



# कामोठ्यात दि.बा. पाटील यांना अभिवादन

**कामोठे : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या कामोठे येथील लोकनेते दि. बा. पाटील विद्यालयामध्ये लोकनेते दि. बा.पाटील यांची पुण्यतिथी करण्यात आली.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला विद्यालयाचे स्थानिक स्कूल कमिटीचे चेअरमन जयदास गोवारी, व्हाईस चेअरमन विनायक म्हात्रे, माजी चेअरमन व शिक्षणप्रेमी स्वामी आप्पा म्हात्रे, माजी चेअरमन बाळाराम चिपळेकर, विद्यालयाचे मुख्याध्यापक तथा रायगड विभागीय अधिकारी कोंगेरे एम.के.या मान्यवरांनी प्रतिमेचे पूजन केले. विद्यार्थी मनोगतातून श्वेता भोसले, अक्षरा चव्हाण, शर्वरी शेंडगे, विद्या गुंड, स्वराली म्हात्रे या विद्यार्थ्यांनी दि. बा .पाटील यांच्या जीवन कार्याची माहिती दिली. विद्यालयातील शिक्षक दीपक खुटले सर व पाटील एस.डी मॅडम यांनी दि.बा .पाटील यांचे विचार आपले मनोगतातून मांडले. विद्यालयाचे चेअरमन जयदास गोवारी यांनी दि.बा. पाटील यांचे कुटुंब व त्यांनी केलेला संघर्ष याविषयी माहिती विद्यार्थ्यांना दिली.



अध्यक्षीय भाषणातून स्वामी आप्पा म्हात्रे यांनी प्रकल्पग्रस्तांचे कैवारी दि.बा. पाटील यांच्या नेतृत्व, चिकाटी, संघर्ष या सामाजिक गुणांची ओळख विद्यार्थ्यांना करून दिली.

इयत्ता दहावी ब मधील संध्या हाके, प्रांजल खुंटे या विद्यार्थिनीनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले तसेच १० वी ब च्या वर्गशिक्षिका एस. डी पाटील यांनी या कार्यक्रमाचे नियोजन केले.

# एसीच्या आऊटर कॉम्प्रेसरची चोरी

**पनवेल :** दुकानाच्या बाहेर शटर जवळ लावलेल्या एसीचा आऊटर कॉम्प्रेसर अज्ञात चोरट्यांनी चोरून नेल्याची घटना घडली. या प्रकरणी खांदेश्वर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे. पोलीस चोरट्यांचा शोध घेत आहेत.

कामरान शेख हे चेंबूर, मुंबई येथे राहतात. नवीन पनवेल येथे डी मार्टच्या बाजूला, सेक्टर-५ येथे स्टाईल अँड कलर्स नावाचे त्यांचे कपड्याचे दुकान आहे. कपड्याच्या दुकानांमध्ये व्हिडीओकॉन कंपनीचा एसी आहे. त्याचा कॉम्प्रेसर त्यांनी दुकानाच्या बाहेर शटरच्या बाजूला ड्रिल करून लावला होता. त्यांनी दुकान उघडले असता, एसीचा कॉम्प्रेसर अज्ञात चोरट्यांनी चोरून नेल्याचे त्याच्या निदर्शनास आले.

# ‘दिबां’च्या स्मृतिदिनानिमित्त आरोग्य शिबिर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

प्रकल्पग्रस्तांचे नेते लोकनेते स्व. दि.बा. पाटील यांच्या स्मृतिदिनानिमित्त लायन ग्रुप महाराष्ट्र राज्य आणि पनवेल उरण आगरी समाज मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने पनवेल शहरातील ज्योतिबा महात्मा फुले सभागृहात मंगळवारी (दि. २४) मोफत नेत्र तपासणी व चष्मे वाटप, दंत चिकित्सा, ईसीजी, मधुमेह, रक्तदाब तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले होते. या शिबिराचे उद्घाटन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, माजी नगराध्यक्ष जे.एम. म्हात्रे यांच्या प्रमुख उपस्थितीत आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते झाले.

शिबिराच्या उद्घाटनावेळी भाजपचे जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, सरचिटणीस नितीन पाटील, कृती समितीचे खजिनदार जे. डी. तांडेल, माजी नगरसेवक विजय चिपळेकर, माजी नगरसेविका दर्शना भोईर, हेमलता म्हात्रे, सारिका भगत, भाजपचे पनवेल शहर मंडळ अध्यक्ष सुमित झुंझारराव, लायन ग्रुपचे अध्यक्ष





बाळू फडके, उपाध्यक्ष रवींद्र शेळके, महिला अध्यक्ष माजी नगरसेविका नीता माळी, विजय गायकर यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

या वेळी ‘दिबा’साहेबांच्या प्रतिमेस पुष्पमाला अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

या शिबिरात ४९२ नागरिकांची आरोग्य तपासणी तसेच २९४ गरीब, गरजू नागरिकांची नेत्र तपासणी करण्यात आली. यामध्ये २७५ नागरिकांना चष्मा वाटप करण्यात आले.

# ‘दिबां’च्या क्रांतिकारी विचारांचे सदैव स्मरण ठेवा -प्रतिज्ञा घरत

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

प्रकल्पग्रस्त, दीन दलितांचे कैवारी गोरगरीब उपेक्षित, वंचित बहुजनांचे झुंजार लढवय्यै लोकनेते दि.बा.पाटील यांच्या क्रांतीकारी विचारांची धग सतत तेवत ठेवून त्यांच्या विचारांचे सदैव स्मरण करावे, असे आवाहन रयत शिक्षण संस्थेच्या गव्हाण येथील श्री.छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ.भगत ज्युनिअर कॉलेजमधील उपशिक्षिका प्रतिज्ञा घरत यांनी केले.



विद्यालयाच्या वतीने स्वर्गीय दि.बा.पाटील यांच्या पुण्यतिथी निमित्त आयोजित केलेल्या अभिवादन सभेत बोलताना प्रतिज्ञा घरत यांनी जासई येथील प्रकल्पग्रस्तांसाठी बलिदान दिलेल्या हुतात्म्यांच्या रक्तरंजित इतिहासाचे रोमांचकारी वर्णन करून दि.बा.यांच्या आयुष्यामधील महत्त्वाचे प्रसंग सांगितले. आपल्या भाषणातून त्यांनी दिबांचा संपूर्ण जीवनपट विद्यार्थ्यांसमोर सादर केला. त्यांच्या जीवनातील गहिवरून येणारे प्रसंग, त्यांचा त्याग, गोरगरिबांसाठी त्यांनी केलेले कष्ट व आंदोलने यांची सादांत माहिती त्यांनी सांगितली.

या वेळी झालेल्या अभिवादन सभेत विद्यालयाचे ज्येष्ठ शिक्षक सागर रंधवे व देवेंद्र म्हात्रे यांचीही समायोचित भाषणे झाली. प्रारंभी लोकनेत स्वर्गीय दि.बा.पाटील यांच्या प्रतिमेस विद्यालयाच्या प्राचार्या ज्योत्स्ना ठाकूर यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. त्यानंतर गुरुकुल प्रमुख संदीप भोईर यांनी श्रीफळ अर्पण केले. रयत शिक्षण संस्थेचे लाईफ मेंबर रवींद्र भोईर यांचेसह विद्यालयातील सर्व अध्यापक व अध्यापिका यांनी स्वर्गीय लोकनेते दि.बा.पाटील यांच्या प्रतिमेस अभिवादन केले.

या अभिवादन सभेचे प्रास्ताविक विद्यालयाच्या सांस्कृतिक विभाग प्रमुख एच.आर.पाटील यांनी केले तर दर्शना माळी यांनी आभार मानले.

# किल्ले रायगड स्वच्छता मोहीम

## नादस्फुर्ती ढोल ताशा पथक सामाजिक संस्थेतर्फे उपक्रम

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल येथील नादस्फुर्ती ढोल ताशा पथक सामाजिक संस्था हे केवळ सांस्कृतिक उत्सवांमध्ये सहभागी न होता, दरवर्षी सामाजिक बांधिलकी जपणारे उपक्रमही सातत्याने राबवत असते.

याच सामाजिक जाणिवेचा भाग म्हणून यावर्षी स्वराज्याची राजधानी किल्ले रायगड येथे विशेष स्वच्छता मोहीम राबवण्यात आली. पथकातील सदस्यांनी एकत्र येऊन गडावरील परिसरातील प्लास्टिक कचरा तसेच गडावर चढण्यासाठी/उतरण्यासाठी असणारी पायवाट तेथील तब्बल २५ बॅग्स कचरा उचलून खाली आणला. हा उपक्रम म्हणजे पर्यावरण रक्षण, ऐतिहासिक वारशाचे जतन आणि



स्वराज्याप्रती असलेला आदर यांचे सुंदर उदाहरण ठरले. इतिहास केवळ जतन करण्यासाठी नव्हे, तर त्याला स्वच्छ आणि सन्मानित ठेवण्यासाठीही आपली जबाबदारी आहे. या भावनेतून किल्ले रायगड स्वच्छता मोहीम राबवण्यात आली होती.

# लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्याकडून खारकोपरच्या घरत कुटुंबियांचे सांत्वन

**उरण : प्रतिनिधी**

पनवेल तालुक्यातील खारकोपर येथील भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ कार्यकर्ते पांडुरंग बुधाजी घरत (वय ६३) यांचे मंगळवारी (दि.१७) अल्पशा आजाराने राहत्या घरी पहाटेच्या सुमारास, दुःखद निधन झाले. त्यांच्या निधनाचे वृत्त लोकनेते माजी खासदार रामशेठ ठाकूर यांना समजताच त्यांनी घरत कुटुंबियांच्या खारकोपर येथील निवासस्थानी जाऊन त्यांची सांत्वनपर भेट घेतली.

या वेळी त्यांच्या समवेत भाजपचे पनवेल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत, भाजपचे ज्येष्ठ कार्यकर्ते वाय. टी. देशमुख, विजय घरत, सचिन घरत, जितेंद्र म्हात्रे, हेमंत ठाकूर, सुधीर ठाकूर, संदीप म्हात्रे, जयवंत देशमुख, बाबुराव कांबळे, अनिल देशमुख तसेच अन्य कार्यकर्ते उपस्थित होते.

या वेळी पांडुरंग घरत यांचे पुत्र आशिष घरत, मयूर घरत तसेच भाऊ घरत, गजानन घरत, कमळाकर घरत, रणधीर घरत व पुतणे सचिन घरत, संदीप घरत यांच्याशी चर्चा करून त्यांना धीर दिला. कै. पांडुरंग घरत यांचे उत्तरकार्य तेरावाविधी रविवारी (दि.२९) खारकोपर येथील राहत्या घरी दुपारी बारा वाजता होणार असल्याची माहिती घरत कुटुंबीयांतर्फे देण्यात आली.



# आणीबाणीत बंदीवास भोगलेल्यांचा आज सन्मान

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

केंद्र व राज्य शासनाच्या सूचनेप्रमाणे आणीबाणी कालावधीत लोकशाहीचा लढा व बंदिवास भोगावा लागलेल्या मान्यवरांचा सन्मान या विशेष कार्यक्रमाचे आयोजन २५ जुन रोजी आद्य क्रांतीकारक वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहामध्ये सकाळी ११ वाजता करण्यात आले आहे.

या कार्यक्रमास महापालिका कार्यक्षेत्रातील आणीबाणी कालावधीत लोकशाहीच्या लढ्यांमध्ये बंदिवास भोगावा लागलेले १० मान्यवर, आमदार प्रशांत ठाकूर, आमदार विक्रांत पाटील, मनपा आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे, अतिरिक्त आयुक्त गणेश शेटे, महापालिका अधिकारी या कार्यक्रमांस उपस्थित राहणार आहे. २५ जून १९७५ ते ३ मार्च १९७७ या कालावधीत आणीबाणी घोषित करण्यात आली होती. याघटनेला ५० वर्षे पूर्ण होत असताना त्या अनुषंगाने केंद्र सरकारमार्फत तयार करण्यात आलेले ’आणीबाणी विशेष स्मरण प्रदर्शन’ आयोजित करण्यात आले आहे.

आद्य क्रांतीकारक वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहाच्या तळमजल्यावरती या प्रदर्शनाचे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते करण्यात येणार आहे. या कार्यक्रमात पनवेलकरांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन पालिकेच्यावतीने करण्यात येत आहे.

## संपादकीय

# शांतता परतेल?

गेले बारा दिवस अवघ्या जगाला चिंतेत ढकलणाऱ्या इस्रायल-इराण युद्धात आपणच युद्धविराम घडवून आणल्याची घोषणा अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी केली आणि पुढील २४ तासांत ही युद्धबंदी लागू होईल असेही जाहीर केले. त्यानंतर काही काळ संभ्रमावस्थेत गेला आणि मग इस्रायल आणि इराण या दोन्ही देशांनी या युद्धात आपणच जिंकल्याचा दावा केला. पण या कथित युद्धविरामानंतर पश्चिम आशियात शांतता परतून येईल का याची खात्री मात्र लगेच तरी कुणालाही वाटत असल्याचे दिसत नाही.

**इराणवर हल्ले करताना इस्रायलने इराणच्या अणुकार्यक्रमाकडे बोट दाखवले होते. त्यामुळे या युद्धात अमेरिका उडी घेईल अशी शक्यता अगदी सुरुवातीपासूनच वर्तवली जात होती. अखेर अमेरिकेने इराणच्या फोर्दो, नतान्झ आणि इस्फाहान येथील अणुभट्ट्यांवर 'बंकर बस्टर' बॉम्बचे हल्ले केले. परंतु या हल्ल्यांमुळे इराणची आण्विक क्षमता संपली आहे वा नाही हे तूर्तास तरी स्पष्ट झालेले नाही. अमेरिकेच्या हल्ल्यांनी इस्रायल-इराण युद्धाची व्याप्ती वाढेल अशी जी भीती होती ती मात्र खरी ठरली. अमेरिकेने आपल्या तीन अणुकेंद्रांवर केलेल्या माऱ्याचे प्रत्युत्तर म्हणून इराणने सोमवारी कतार आणि इराकमधील अमेरिकेच्या लष्करी तळांवर क्षेपणास्त्रांचा मारा केला. यामुळे इराण विरुद्ध इस्रायल-अमेरिका हा संघर्ष आणखी चिघळण्याची शक्यता निर्माण झाली. कतारने इराणच्या हल्ल्यांचा तीव्र शब्दांत निषेध केला तर इराणने आपण केवळ अमेरिकेच्या तळाला लक्ष्य केल्याचे सांगत कतारला चुचकारले. या हल्ल्यांमध्ये कोणत्याही अमेरिकी कर्मचाऱ्याचा मृत्यू झाला नाही वा कोणी जखमीही झाले नाही असे अमेरिकेच्या गोटातून सांगण्यात आले. या घडामोडींपाठोपाठ अचानक इस्रायल-इराणमध्ये युद्धबंदी झाल्याची घोषणा डोनाल्ड ट्रम्प यांनी केली. पण इराणने लागलीच अद्याप कोणतीही सहमती झाली नसल्याचेही जाहीर केले. त्यामुळे युद्धासंदर्भात नेमकी काय परिस्थिती आहे याबाबत पुढचे अनेक तास जगभरात संभ्रम निर्माण झालेला दिसला. भारत आणि पाकिस्तान यांच्यातील संघर्षादरम्यानही ट्रम्प यांनी अशाच तऱ्हेने दोन्ही संबंधित देशांच्या आधीच शस्त्रसंधीची घोषणा केली होती. ट्रम्प यांच्या मध्यस्थीनंतर दोन्ही देशांत शस्त्रविरामाबाबत एकमत झाले, मात्र त्यानंतर काही तासांतच इराणने तेल अविववर नव्याने क्षेपणास्त्र डागल्याचा दावा इस्रायलने केला. हे शस्त्रविरामाचे उल्लंघन असल्याचे इस्रायलने म्हटले. परंतु त्यानंतर ट्रम्प इस्रायलवरही संतापलेले दिसले. इराणवर बॉम्ब टाकू नका. असे केल्यास ते मोठे उल्लंघन ठरेल असे ट्रम्प यांनी म्हटले. एकीकडे, आपणच युद्धविराम घडवला असे ट्रम्प यांच्याकडून पुन्हा पुन्हा होणारे दावे आणि दुसरीकडे संबंधित देशांची आक्रमकता यामुळे अवघे जग संभ्रमात ढकलले गेले. युद्धविराम नाही असे मत आंतरराष्ट्रीय संबंधविषयक तज्ज्ञ व्यक्त करीत होते. पश्चिम आशियातील परिस्थिती निवळण्यासाठी आंतरराष्ट्रीय मुत्सद्देगिरीची आवश्यकता आहे असेही अनेकांचे मत दिसले. इस्रायलच्या आक्रमकतेतून हे युद्ध सुरू झाले अशी काही युरोपीय देशांची भूमिका आहे. तर भारताने मात्र तटस्थ भूमिका कायम ठेवली आहे. अमेरिकेने या युद्धात उडी टाकून काय साध्य केले याचीही चर्चा होते आहे. नसत्या युद्धामध्ये अमेरिकेने पडू नये अशी भूमिका ट्रम्प यापूर्वी कायम घेत आले होते. पण इस्रायल-इराण संघर्षात मात्र ते भूमिका बदलताना दिसले. या आंतरराष्ट्रीय घडामोडींतून संयुक्त राष्ट्रांसारख्या संघटनेचा कमकुवतपणा मात्र चव्हाट्यावर आला आहे.**

# आंबेत व टोळ पुलांचे भवितव्य अंधारात




**खबरबात**
**महेश शिंदे**

राज्याचे तत्कालीन मुख्यमंत्री व कोकणचे सुपुत्र कै. बॅरिस्टर ए.आर.अंतुले यांच्या प्रयत्नाने झालेल्या आंबेत व टोळ पुलांचे भवितव्य अंधारात आहे. कालबाह्य झालेले हे पुल नव्याने उभारणीसाठी स्थानिक लोकप्रतिनिधींमध्ये उदासीनता असल्याने केवळ दुरुस्तीवरच लाखो रुपये खर्च केले जात आहेत. भविष्यात या मार्गावरील दोन्ही जिल्ह्यातील लोकांना याचा फटका बसणार असून या दोन पुलांच्या उभारणीसाठी राज्य सरकार निधी देणार की केंद्र सरकार याबाबत संभ्रमावस्था आहे

कोकणातून मुंबईत जाणारा मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक पूर्वीचा १७ व आत्ताचा ६६ या महामार्गावर असलेला सावित्री नदीवरील पुल २ ऑगस्ट २०१६ रोजी कोसळला होता. महाड तालुक्यात सह्याद्रीच्या पर्वतरांगांमध्ये तसेच महाबळेश्वर येथे मोठ्या प्रमाणावर पर्जन्यवृष्टी झाल्याने पूर परिस्थिती पुल कोसळण्याची दुर्घटना घडली होती. या अपघातात एसटी मधून प्रवास करणारे ३२ प्रवासी मृत्युमुखी पडले तर २ खाजगी प्रवासी वाहने देखील नदीपात्रात वाहून गेल्याने त्यामधील तीन प्रवासी मृत्युमुखी पडले होते.

मुंबई व राष्ट्रीय महामार्गावरील सावित्री पूल दुर्घटनेनंतर राज्यातील सर्वच जिल्ह्यातील धोकादायक पूलांचे (अंडरवॉटर सर्वेक्षण) परीक्षण करण्याबाबत राज्याच्या सार्वजनिक बांधकाम विभागाने आदेश दिले होते मात्र त्यानंतर या सर्वेक्षणाच्या अहवालाचे ९ वर्षात. काय झाले याचे उत्तर मात्र गुलदस्त्यात आहे नऊ वर्षात दोन सरकार झाले, दोन सार्वजनिक बांधकाम मंत्री झाले मात्र पुण्यातल्या कुंडमळा येथील इंद्रायणी नदीवरील पायी साकव कोसळून झालेल्या दुर्घटनेनंतर राज्य सरकारला पुन्हा जाग आली आहे.

तसेच प्रत्येक जिल्ह्यासाठी रस्ते दुरुस्ती व देखभालीसाठी उपलब्ध निधी मधील १० टक्के निधी पुलांच्या दुरुस्तीच्या कामासाठी राखीव ठेवावा मात्र या दहा टक्के निधीवर देखील मागील नऊ वर्षात किती ठिकाणी खर्च झाला ही घटना संशोधनाची आहे कारण दहा टक्के निधी जर खर्च झाला असता तर पुण्यातील दुर्घटना घडली नसती.

रायगड व रत्नागिरी जिल्ह्याला जोडणाऱ्या आंबेत व टोळ तसेच महाड मधील दादली पुलाची निर्मिती ही तत्कालीन कोकणचे सुपुत्र व माजी मुख्यमंत्री कै. ए .आर.अंतुले यांनी केली होती आज आंबेत तेथील पुलाला ४७ वर्षे पूर्ण झाली आहेत. सन २०१७/२०१८ मध्ये हा पुल धोकादायक असल्याने त्याची तात्पुरती दुरुस्ती केली होती मात्र २०१९मध्ये वाळू वाहतूक करणाऱ्या बार जने दिलेल्या धडके मध्ये पुलाचा एक खांब सरकल्याने पूर्ण धोकादायक झाला अखेर दोन वर्षांनी या पुलाच्या दुरुस्तीसाठी करोडो रुपये खर्च करून२७. जून२०२१. रोजी रायगड जिल्ह्याच्या पालकमंत्री कुमारी आदिती तटकरे व रत्नागिरी जिल्ह्याचे पालकमंत्री अनिल परब रायगड लोकसभा मतदारसंघाचे खासदार सुनील तटकरे यांच्या उपस्थितीत पुन्हा हा वाहतुकीसाठी लोकार्पण करण्यात आला.

त्याचप्रमाणे टोळ व दादली पुलाला देखील ४० वर्षाहून अधिक कार्यकाळ झाला मात्र केवळ दादलीपुलाच्या नवीन कामाला मान्यता मिळाली असली तरी आंबेत व टोळ या दोन पूलांच्या नव्या कामाला निधी मंजूर झालेला नाही. पुलांच्या कामासाठी लागणारा करोडो रुपयांचा खर्च राज्य सरकार की केंद्र सरकार करणार असा प्रश्न या निमित्ताने उपस्थित होत आहे मात्र याबाबत दोन्ही जिल्ह्यातील लोकप्रतिनिधी मात्र उदासीन असल्याचे चित्र पाहण्यास मिळत आहे कारण दोन्ही ठिकाणी नवीन पूल निर्मितीला किमान तीन वर्षाचा अवधी लागण्याची शक्यता आहे मात्र मंजुरीला किती काळ लागेल हा देखील प्रश्न लोकप्रतिनिधींच्या मागणीनंतरच राज्य सरकार या करिता निधी देते की केंद्र सरकारकडे बोट दाखवते हा खरा प्रश्न असल्याने दोन जिल्ह्यातील सीमा वरती भागातील नागरिकांना मात्र तारेवरची कसरत करावी लागणार असल्याची चर्चा दोन्ही जिल्ह्यातील नदीकाठच्या नागरिकांमध्ये चर्चिली जाऊ लागले आहे.

# संगीतकार मदनमोहन

मदनमोहन यांचा जन्म बगदाद, इराक येथे दि. २५ जून १९२४ रोजी एका धनिक कुटुंबात झाला. त्यांचे वडील रायबहादूर चुनिलाल कोहली हे एक वजनदार असामी होते. बगदादमधून रावळपिंडी-चकवाल येथे काही वर्षे वास्तव्य केल्यावर कोहली कुटुब मुंबईत स्थायिक झाले.

मदनमोहन यांचे देखणे रूप आणि संगीताची आवड ह्या दोन्ही गोष्टी आईकडूनच आल्या होत्या. लहानपणापासूनच त्यांना संगीताची अतोनात आवड होती. लाहोर येथे राहण्याच्या काळात, त्यांनी एक लहान काळापासून कार्तार सिंगच्या शास्त्रीय संगीताचे मूलभूत ज्ञान शिकले, परंतु त्यांना कधीही संगीतामध्ये औपचारिक प्रशिक्षण मिळाले नाही. काही काळानंतर, त्याचे कुटुंब मुंबईत स्थायिक झाले जेथे त्यांनी बायकुल्ला मुंबई मधील सेंट मेरीस स्कूलमधून त्यांचे वरिष्ठ केंब्रिज पूर्ण केले. ११ वर्षांच्या वयात त्यांनी बॉम्बेच्या कार्यक्रमांमध्ये ऑल इंडिया रेडिओद्वारे प्रसारित केले. १७ व्या वर्षी, त्यांनी देहरादूनमधील



कर्नल ब्राउन केंब्रिज स्कूल येथे एक वर्षाचे प्रशिक्षण पूर्ण केले.

लखनौमध्ये मदन मोहन यांची खरी जडणघडण झाली. बेगम अख्तर, सिद्धेश्वरी देवी, बरकत अली खान व इतर अनेक दिग्गजांची गाणी मदनमोहन यांनी भरभरून ऐकली. खरं पाहता त्यांनी हिंदुस्थानी शास्त्रीय संगीताचे शिक्षण असे घेतलेच नव्हते पण त्यांनी एकलव्यासारखे श्रवणभक्तीतून खूपच ज्ञान मिळविले होते. हिराबाई बडोदेकरांचा त्यांच्यावर प्रभाव होता व पुण्याच्या सवाई गंधर्वची वारीही त्यांनी कधी चुकविली नाही.

मुंबईत काही काळ सचिनदेव बर्मन व श्यामसुंदरकडे उमेदवारी केल्यावर १९५० मध्ये त्यांनी पहिल्यांदा 'आँखें' या चित्रपटास स्वतंत्रपणे संगीत दिले. पण एकावन सालच्या 'मदहोश' चे संगीत खूप गाजले. 'मेरी याद में तुम ना' हे तलतने अतिमुलायम आवाजात गायलेलं गाणं आजही लोकप्रिय आहे.

मधुरता व भाव-भावनाचा उत्कृष्ट परिपोष मदनमोहन यांच्या संगीतात प्रकर्षाने जाणवतो. गझल, ठुमरी हे तर त्यांचे हक्काचे किल्लेच होते.हिंदी,उर्दूवर त्याचे उत्तम प्रभूत्व होते.हिंदूस्थानी वाद्यांचा सुयोग्य वापर हे त्यांच आणखी एक वैशिष्ट्य. ते सतारीचे विशेष चाहते होते.संगीतकार मदन मोहन यांचे १४ जुलै,१९७५ साली निधन झाले.. साभार - इंटरनेट

## बदलते तंत्रज्ञान

# एसयूव्ही स्कॉर्पिओ-झेड४ ऑटोमॅटिक

महिंद्रा अँड महिंद्राने त्यांच्या लोकप्रिय एसयूव्ही स्कॉर्पिओ-एनचा एक नवीन प्रकार, झेड४ ऑटोमॅटिक व्हेरियंट लाँच केला आहे. तो बेस व्हेरिएंट झेड२ च्या वर ठेवण्यात आला आहे. यामुळे ऑटोमॅटिक ट्रान्समिशनसह स्कॉर्पिओ आणखी स्वस्त झाली आहे.यापूर्वी, झेड४ व्हेरिएंट फक्त ६-स्पीड मॅन्युअल गिअरबॉक्ससह उपलब्ध होता. आता त्यात पेट्रोल आणि डिझेल इंजिन पर्यायांसह ६-स्पीड टॉर्क कन्व्हर्टर ऑटोमॅटिक गिअरबॉक्स देण्यात आला आहे.



झेड४ पेट्रोल ऑटोमॅटिकची किंमत १७.३९ लाख रुपये (एक्स-शोरूम) आहे, तर झेड४ डिझेल ऑटोमॅटिकची किंमत १७.८६ लाख रुपये आहे. भारतात, ते टाटा हॅरियर आणि सफारीशी स्पर्धा करते, तर या किंमत श्रेणीमध्ये ते ह्युंदाई क्रेटा आणि किआ सेल्टोसच्या टॉप लाइन प्रकारांशी देखील स्पर्धा करते.

महिंद्रा स्कॉर्पिओ-एन मध्ये २.०-लिटर एमस्टॅलियन टर्बोचार्ज्ड पेट्रोल इंजिन आणि एमहॉक डिझेल इंजिन आहे. पेट्रोल इंजिन असलेली ही एसयूव्ही ६-स्पीड मॅन्युअल ट्रान्समिशनसह २०३ एचपी पॉवर आणि ३७० एनएम पीक टॉर्क निर्माण करते. ६-स्पीड टॉर्क कन्व्हर्टर ऑटोमॅटिक गिअरबॉक्ससोबत जोडल्यास हेच इंजिन १० एनएम जास्त टॉर्क निर्माण करते.

**अँड्रॉइड ऑटो आणि ॲपल कारप्लेसह ८-इंच टचस्क्रीन**

स्कॉर्पिओ-एन ७० हून अधिक कनेक्टेड फीचर्ससह येते. त्याच्या न४ ट्रिममध्ये ८-इंच टचस्क्रीन, वायर्ड अँड्रॉइड ऑटो आणि ॲपल कारप्ले, स्टीअरिंग-माउंटेड कंट्रोल्स, दुसऱ्या रांगेत एसी व्हेंट्स, हॅलोजन हेडलाइट्स, एलईडी टर्न इंडिकेटर, प्लास्टिक कव्हर्ससह १७-इंच व्हील्स, मागील स्पॉयलर, पॉवर विंडो आणि फॅब्रिक अपहोल्स्ट्री अशी वैशिष्ट्ये आहेत.

६ एअरबॅग आणि टायर प्रेशर मॉनिटरिंग सिस्टम सुरक्षेसाठी, महिंद्राने सर्व चाकांमध्ये डिस्क ब्रेक, ६ एअरबॅग्ज, सेन्सरसह रिव्हर्स कॅमेरा, टायर प्रेशर मॉनिटरिंग सिस्टम, क्रूझ कंट्रोल आणि मागील डिस्क ब्रेक अशी अनेक वैशिष्ट्ये दिली आहेत.

# पद्मश्री प्रा. वि.ग.भिडे.



**निमित्त**

घनस्थिती भौतिकी आणि सौर ऊर्जा या क्षेत्रात आयुष्यभर काम करणा-या प्रा.विष्णु गणेश भिडे यांचा जन्म ४ ऑगस्ट, १९२५ रोजी नागपूरला झाला. त्यांचे शालेय तसेच महाविद्यालयीन शिक्षण नागपूर येथेच झाले. नागपूर विद्यापीठाची भौतिक शास्त्रातील एम.एससी. ही पदवी त्यांनी प्रथम वर्गात प्रथम क्रमांकाने मिळवली. त्यावेळी त्यांना अनेक शिष्यवृत्त्या आणि बक्षिसे मिळाली. त्यानंतर ते लगेच नागपूरच्या इन्स्टिट्यूटऑफ सायन्समध्ये भौतिक शास्त्राचे व्याख्याते म्हणून रुजू झाले. त्यांना १९५६ मध्ये लंडन विद्यापीठाने डॉक्टरेट दिली. त्यानंतर ते मुंबईला आले आणि इन्स्टिट्यूटऑफ सायन्समध्ये ते प्रथम प्राध्यापक म्हणून व नंतर विभागप्रमुख म्हणून काम करू लागले. त्यावेळी त्यांनी इन्स्टिट्यूटमध्ये मॉसबॉअर स्पेक्ट्रोस्कोपीचे संशोधन सुरु केले. ह्या विषयाचे भारतातील ते पहिले संशोधन होते.

१९७३ ते १९७५ ही दोन वर्षे ते भारत सरकारचे विज्ञान विषयक सल्लागार होते. १९७५ साली ते भारत सरकारच्या काउन्सिल ऑफ सायंटिफिक अँड इंडस्ट्रियल रिसर्च उर्फ सीएसआयआरच्या नॅशनल फिजिकल लॅबोरेटरीत उपसंचालक या पदावर काम करू लागले. घनस्थिती भौतिकीच्या क्रिस्टल ग्रोथ,फेरो इलेक्ट्रिसिटी, फेरो मॅग्नेटिझम,लिक्विड क्रिस्टल,मॉसबॉअर आणि एक्स रे स्पेक्ट्रोस्कोपी या विषयात त्यांनी संशोधन केले. नवनवीन पदार्थ शोधण्यात ते गर्क असत. त्यात ते टिटॅनियमही शोधत असत. नेहमीपेक्षा वेगळे असे ऊर्जा निर्मितीचे स्रोत ते शोधू लागले. सौर ऊर्जेचा भारतातील खेड्यांच्या विकासासाठी कसा उपयोग करून घेता येईल यावर त्यांनी संशोधन केले.

दिल्लीची नॅशनल फिजिकल लॅबोरेटरी सोडून प्रा.वि.ग.भिडे १९८२ साली पुणे विद्यापीठात आले आणि 'स्कूल ऑफ एनर्जी स्टडीज' या विभागात स्टेट बँक ऑफ इंडियाने प्रायोजित केलेल्या प्राध्यापकपदी अध्यापन आणि संशोधन करू लागले.

आंतरविद्यापीठ आणि भारत सरकारचा अणुसंशोधन आयोग यांच्या संयुक्त विद्यमाने स्थापन झालेल्या संस्थेचे संस्थापक अध्यक्ष झाले. प्रा.वि.ग.भिडे यांनी आपले सर्व प्रकारचे संशोधन अनेक लेख राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय जर्नलमध्ये प्रसिद्ध केले. इंग्लंड, फ्रांस, जर्मनी, अमेरिका, झेकोस्लोव्हाकिया. रशिया, इस्रायल, जपान इत्यादी प्रगत देशांनी त्यांना सन्मानाने बोलावून घेऊन त्यांच्याज्ञानाचा फायदा घेतला आहे.

प्रा.वि.ग. भिडे यांना भारत सरकारने १९९२ साली पद्मश्री किताबत दिली होती. त्याशिवाय त्यांना डॉ.सी.व्ही.रामन आणि मेघनाथ साहा पुरस्कार मिळाले होते. अनेक संस्थात त्यांनी महत्त्वाची भाषणे दिली आहेत. १९७४ साली मराठी विज्ञान परिषदेने त्यांचा नवव्या मराठी विज्ञान अधिवेशनात सन्मान केला होता तर मराठी विज्ञान परिषदेच्या वडोदरा येथे भरलेल्या १९७९ सालच्या चौदाव्या वार्षिक अखिल भारतीय मराठी विज्ञान अधिवेशनाचे ते अध्यक्ष होते. प्रा.वि.ग.भिडे उतारवयात पुणे सोडून नागपूर या त्यांच्या जन्मगावी गेले आणि तेथेच २५ जून, २००६ रोजी त्यांचे वयाच्या ८०व्या वर्षी निधन झाले.

## बातमीतील बात




## आरोग्य प्रहर

# यकृताच्या आरोग्यासाठी जांभूळ फायदेशीर

मधुमेह असलेल्या लोकांना जांभूळ खाण्याचा सल्ला अनेकदा दिला जातो, ज्याला आपण ब्लॅक प्लम किंवा इंडियन ब्लॅकबेरी सुद्धा म्हणते, कारण जांभूळ रक्तातील साखर लवकर वाढवत नाही, पण तुम्हाला माहितीये का जांभूळ यकृताच्या आरोग्यासाठीसुद्धा एक चांगला पर्याय आहे. जांभूळ यकृताच्या आरोग्यासाठी कसे फायदेशीर आहे?

जांभळामध्ये अँथोसायनिन्स आणि फ्लेव्होनॉइड्ससारखे अँटीऑक्सिडंट्स असतात, जे यकृत स्वच्छ ठेवण्यास आणि ऑक्सिडेटिव्ह स्ट्रेस कमी करण्यास किंवा पेशींचे संरक्षण करण्यास मदत करतात. ते यकृतातील जळजळ तसेच एन्झाइम्सची पातळी कमी करतात आणि खराब झालेल्या यकृतातील पेशी पुन्हा तयार करण्यास मदत करतात. जांभळाचे नियमित सेवनाने यकृतामध्ये फॅट्स तयार होणे कमी होऊ शकते. विशेषतः ज्या लोकांची खूप जास्त कोलेस्ट्रॉलची पातळी वाढली आहे किंवा ज्यांना लठ्ठपणा आहे, त्यांना जांभूळ खाणे फायदेशीर ठरू शकते. जांभूळ पित्त नियंत्रित करण्यास मदत करते, पोटाशी संबंधित आजार कमी करते, तसेच पचनसंस्था निरोगी ठेवते, यामुळे अप्रत्यक्षपणे यकृत निरोगी राहते.



**जांभूळ रक्तातील साखर कशी नियंत्रित करते?**

आपले शरीर स्टार्चचे रुपांतर साखरेत कसे करते याचे नियमन करणारे कंपाउंड या जांभळामध्ये असते, ज्यामुळे रक्तातील साखरेची पातळी आणखी स्थिर राहते. काही अभ्यासातून असे दिसून आले आहे की, जांभूळ शरीराला इन्सुलिनचा अधिक प्रभावीपणे वापर करण्यास मदत करू शकते.

**जास्तीत जास्त फायद्यासाठी जांभूळ कसे खावे?**

जांभूळ कच्चे आणि फ्रेश खाणे सर्वात चांगले आहे. सुरुवातीला जांभूळ चांगले धुवून घ्या. त्यानंतर त्यातील बिया काढून टाका आणि स्नॅक्स म्हणून त्याचे सेवन करा.

वाळलेल्या जांभळाच्या बियांची पावडर बनवून पाण्याबरोबर सेवन करू शकता. डॉक्टरांचा सल्ला घेऊन तुम्ही सकाळी एक चमचा जांभळाच्या बियांची पावडर पाण्याबरोबर घेऊ शकता. साखर न टाकता जांभळाचा ताजा बनवलेला रससुद्धा फायदेशीर आहे. या रसाचे सकाळी सेवन करू शकता. दिवसातून एकापेक्षा जास्त वेळा याचे सेवन करू नका.

# ई-केवायसी करूनही शेतकऱ्यांना नुकसानभरपाई नाही

## भाजपकडून तहसीलदारांना निवेदन



**नेरळ : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यात मागील अवकाळी पावसाने शेतकऱ्यांचे दुबार भात पिकांचे मोठे नुकसान झाले आहे..यावर शासनाकडून पंचनामे करून शेतकऱ्यांनी इ –केवायसी देखील केली परंतु नुकसान भरपाईचा निधी येवून ही तो शेतकऱ्यांना अद्याप देण्यात आला नसल्याने भारतीय जनता पार्टीचे कर्जत शहर मंडल अध्यक्ष आणि ग्रामीण मंडल अध्यक्ष यांनी शेतकऱ्यांच्या बाजूने आवाज उठवला. नुकसान भरपाई मिळण्यास विलंब का होत आहे असा थेट प्रश्न उपस्थित करीत भाजपकडून कर्जत तहसीलदार यांना निवेदन देण्यात आले आहे.

जून महिन्यात कोसळणाऱ्या पावसाने मे महिन्यातच धुमाकुळ घातला होता.रायगड जिल्ह्यातील कर्जत तालुक्यात या मुसळधार पावसाने अक्षरशः सर्वसामान्यांचे कंबरडे मोडले. शेतकऱ्यांनी उन्हाळयात घेतलेले दुबार भात पिकांचे या पावसामुळे मोठे नुकसान झाले होते.शिवाय अंबा बागायतदारांचे देखील नुकसान झालेले आहे. शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेला घास हिरावून गेल्याने उपासमारीची वेळ आली होती.महसूल विभागाकडून शेतकऱ्यांच्या झालेल्या भात पिकांच्या नुकसानाची आणि आंबा पिकांची भरपाई दिली जाणार होती.यासाठी मंडळ अधिकारी,तलाठी यांनी शेताच्या बांधावर जाऊन पंचनामे करून घेतले.

पात्र शेतकऱ्यांनी माहे मे महिन्यात २०२५ मध्ये इ –केवायसी केली आहे. परतू या शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर अद्याप नुकसान भरपाई जमा करण्यात आलेली नाही शिवाय इ –केवायसी आता होत नसल्याने अनेक शेतकरी हे नुकसान भरपाई मिळवण्यासाठी वंचित राहिलेले आहेत.त्यामुळे या शेतकऱ्यांना लवकरात लवकर नुकसान भरपाई मिळावी आणि ज्या शेतकऱ्यांची इ –केवायसी राहिली आहे ती भरून त्यांनाही लाभ मिळवा म्हणून भारतीय जनता पार्टीचे कर्जत शहर मंडल अध्यक्ष राजेश भगत आणि ग्रामीण भाजप मंडल अध्यक्ष दिनेश रसाळ यांनी यावर आवाज उठवला असून शेतकऱ्यांना लवकरात लवकर नुकसान भरपाई मिळण्यासाठी पुढाकार घेतला यासाठी आज तहसीलदार धनंजय जाधव यांना निवेदन दिले असून तहसीलदार यांनी यासाठी सकारात्मकता दाखवली आहे.यावेळी निवेदन देतना भाजपचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## 'जिओ टॅगिंग अट शिथील करा'

**अलिबाग : प्रतिनिधी**

जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागाकडून कामांची देयके झेडपीएफएमएस प्रणालीमार्फत अदा केली जातात. मात्र जून महिन्यांपासून या प्रणालीसाठी जिओ टॅगिंगची सक्ती करण्यात आली आहे. ही अट शिथील करा अशी मागणी रायगड जिल्हा परिषद ठेकेदार संघटनेनी केली आहे. अतिरीक्त मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यजीत बढे यांना संघटनेच्या वतीने निवेदन देण्यात आले. ग्रामिण भागात नेटवर्क कनेक्टीव्हिटी नसल्याने जिओ टॅगिंग करण्यात अडचणी येत आहेत. त्यामुळे जिओ टॅगिंगची सक्ती अट शिथील करण्यात यावी अशी मागणी संघटनेनी केली.

### परिशिष्ट क्र. १६

**(उपविधी क्र. ३५ अन्वये)**

**मयत सदस्याचे संस्थेच्या भांडवलात/मालमत्तेत असलेले हितसंबंध व भाग हस्तांतरित करण्याबाबत हक्क मागण्या किंवा हरकती मागविण्यासाठी द्यावयाच्या नोटिशीचा नमुना (मोठ्या प्रमाणामध्ये प्रसारित होणाऱ्या दोन स्थानिक वर्तमान पत्रांमध्ये प्रसिद्धी देण्यात यावी.)**

**नोटीस**

**सरकारी नोकर** सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित, पत्ता **न.पनवेल** या संस्थेचे सदस्य असलेल्या वा संस्थेच्या इमारतीत / भूखंडावर / गाळा/ बंगला क्र. ...... धारण करणाऱ्या **श्रीमती स्मिता शिरीष कोलगे.** यांचे **तारीख २८/०५/२०२५.** रोजी निधन झाले. त्यांनी नामनिर्देशन केलेले नाही. संस्था, या नोटिशीद्वारे संस्थेच्या भांडवलात /मालमत्तेत असलेले मयत सदस्याचे भाग व हितसंबंध हस्तांतरित करण्यासंबंधी मयत सदस्याचे वारसदार किंवा अन्य मार्गणीदार/हरकतदार यांच्याकडून हक्क मागण्या/हरकती मागवण्यात येत आहेत. ही नोटीस प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून.**१५ दिवसात** त्यांनी आपल्या मागण्यांच्या वा हरकतींच्या पुष्टयर्थ आवश्यक त्या कागदपत्राच्या प्रती व अन्य पुरावे सादर करावेत. जर वर नमूद केलेल्या मुदतीत, कोणाही व्यक्तीकडून हक्क मागण्या किंवा हरकती सादर झाल्या नाहीत तर, मयत सदस्याचे संस्थेच्या भांडवलातील / मालमत्तेतील भाग व हितसंबंध यांच्या हस्तांतरणाबाबत संस्थेच्या उपविधीनुसार कार्यवाही करण्याची संस्थेला मोकळीक राहील. जर अशा कोणत्याही हक्कमागण्या/हरकती आल्या तर, त्याबाबत संस्थेच्या उपविधीनुसार कार्यवाही करण्यात येईल. नोंदी व उपविधींची एक प्रत मागणीदारांस / हरकतदारांस पहाण्यासाठी संस्थेच्या कार्यालयात सचिव यांचेकडे सकाळी **/दुपारी १२:००. वा** ते सकाळी/**दुपारी ४.०० वा.... पर्यंत**, नोटिस दिल्याच्या तारखेपासून नोटिशीची मुदत संपण्याच्या तारखेपर्यंत उपलब्ध राहील.

सरकारी नोकर सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित
यांच्या करिता आणि वतीने

**ठिकाण : न. पनवेल**
**दिनांक : २४/०६/२०२५**

**सही/–**
**सचिव**
**सरकारी नोकर सहकारी गृहनिर्माण संख्या मर्यादित**

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसी द्वारे कळविण्यात येते की, माझे अशिल यांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली निवासी सदनिका मिळकत ही तिचे सध्याचे मालक **१) रूपेश ज्योतिराम पवार, २) स्वाती रूपेश पवार** यांचेकडून कायमची खरेदी घेण्याचे निश्चित केलेले आहे. त्यामुळे **१) रूपेश ज्योतिराम पवार, २) स्वाती रूपेश पवार** यांनी सदरिल निवासी सदनिका मिळकतीबाबत कोणत्याही व्यक्ती बरोबर लेखी करार केलेला असल्यास तसेच या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून **१४ (चौदा)** दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या निवासी सदनिका मिळकतीच्या मालका बरोबर आपला खरेदीव्यवहार पुर्ण करतील. मुदतबाहय हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**

**निवासी सदनिका मिळकतीचे वर्णन :–**

मौजे – कसबे पनवेल, ता. पनवेल, जिल्हा रायगड येथील मा. दुय्यम निबंधक, पनवेल यांचे क्षेत्राधिकारातील पनवेल नगरपरीषद यांचे हद्दीमधिल मौजे – कसबे पनवेल सर्व्हे नंबर– ७४५ हिस्सा नं. १ या मिळकतीवर बांधलेल्या **''जिंदाल रेसिडन्सी''** या इमारती मधील **बी विंग' मधिल, सहाव्या मजल्यावरील, सदनिका क्र. ६०२,** ज्याचे **क्षेत्र २५.२ चौ. मीटर कारपेट** असे आहे.

**येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.**

**सही/–**
**ॲड. जयेश संभाजी म्हसे**

**दिनांक :– २५/०६/२०२४**

**कार्यालयीन पत्ता :–** फ्लॅट नं. ४, ए–विंग,, पहिला मजला, गणेश अर्पाटमेंट, कर्जत नगरपालीका कार्यालय शेजारी, ता. कर्जत, जि. रायगड. ४१०२०१.
मो.नं. ९०२८९८२२७७ ई मेल:–adv.jayeshmhase@gmail.com

# कडाव बसथांबाप्रकरणी पत्रकाराला धमकी; सहकाऱ्यांनी केली निदर्शने



**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील कडाव गावात एसटी बसथांबा बेकायदेशीररित्या बळकावून तिथे अनधिकृत दुकाने उभारण्यात आल्याच्या निषेधार्थ व या विषयावर गेली अनेक वर्षे सातत्याने आवाज उठवत असलेले पत्रकार प्रभाकर गंगावणे यांना धमक्या दिल्याबद्दल पत्रकारांनी सोमवारी (ता.२४) कडाव ग्रामपंचायतीवर धडक दिली. यावेळी ग्रामसेवकांना निवेदन देत २ जुलैपर्यंत बेकायदेशीर बांधकाम हटवण्याची तसेच त्या जागेवरील बांधकाम बद्दल लावण्यात आलेले असेसमेंट रद्द करण्याची मागणी करण्यात आली. अन्यथा १० जुलैपासून ग्रामपंचायतीसमोर बेमुदत उपोषण छेडण्याचा इशारा दिला आहे.

कडाव गावात १९७७ – ७८ साली एसटी महामंडळाने अधिकृत बसथांबा बांधला होता. परंतु आता विनोद काशिनाथ पवाळी, रमेश मारुती पवाळी आणि उमेश यशवंत ऐनकर या तिघांनी संगनमताने त्या जागेवर अनधिकृत बांधकाम करून दुकाने उभारल्याचा आरोप आहे. यामुळे प्रवासी, विद्यार्थी, महिला आणि वृद्धांना त्रास सहन करावा लागत आहे. या प्रकरणाची तक्रार कर्जत एसटी विभाग आणि ग्रामपंचायतीकडे देण्यात आली असूनही अद्याप कोणतीही कारवाई झाली नाही.

उलट ग्रामपंचायतीने परवानगी न देता या दुकानदारांकडून घरपट्टी वसूल केल्याचे उघड झाले आहे. त्यानंतर संबंधित विषयाची बातमी देणारे पत्रकार प्रभाकर गंगावणे यांना एसटी थांबा बळकावणारे व्यक्तीकडून मारण्याची धमकी देण्यात आली. त्यामुळे संतप्त होत कर्जत तालुक्यातील सर्व पत्रकार कडाव ग्रामपंचायत कार्यालयासमोर पोहचले. स्थानिक राजकारणी आणि प्रशासन यांच्याकडून बेकायदेशीर बांधकामाला पाठिंबा मिळतोय याबद्दल पत्रकारांनी नाराजी व्यक्त केली. सबंधित विषयी पत्रकारांनी ग्राम सचिवालय समोर घोषणाबाजी करण्यास सुरुवात केल्यानंतर ग्रामपंचायत अधिकारी गिरासे हे कार्यालयातून बाहेर आले आणि तळमजल्यावर जमलेल्या पत्रकारांना भेटले. तेथे पत्रकारांचे म्हणणे ऐकून घेतल्यावर ग्रामपंचायत अधिकारी गिरासे यांनी कार्यवाही सुरू असून कागदोपत्री परवानगी आल्यावर कार्यवाही होईल, असे आश्वासन दिले.

या निषेध आंदोलनात तक्रारदार प्रभाकर गंगावणे तसेच पत्रकार संतोष पेरणे, रमाकांत जाधव, गणेश पवार, नरेश जाधव, अजय गायकवाड, भूषण प्रधान, कैलास म्हामले, महेश भगत, कृष्णा सगने, किशोर गायकवाड, मोतीराम पादिर, रजनीकांत पवाळी, सतीश पाटील, आनंद सकपाळ, गणेश मते, जगदीश दगडे, कांता हाबळे, रोशन दगडे, गणेश लोट, नरेश कोलंबे यांच्यासह अनेक पत्रकार आणि विविध संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते. सर्वांनी ग्रामपंचायतीकडे जोरदार निषेध नोंदवत दिलेल्या निवेदनात २ जुलै २०२५ पर्यंत कारवाई न झाल्यास १० जुलैपासून कडाव येथील ग्रामपंचायतीसमोर बेमुदत उपोषण सुरू करण्यात येईल, असा स्पष्ट इशाराही देण्यात आला.

# तळाघर येथे वृक्षारोपण; सर्व झाडे जगवण्याचा ग्रामस्थांचा निर्धार

**धाटाव : प्रतिनिधी**

झाडे लावणे सहज शक्य झाले परंतु त्यांची निगा राखणं व त्यांना वेळोवेळी खतपाणी घालणं थोडं अवघडच आहे परंतु रोहा तालुक्यातील तळाघर गावातील गावदेवी क्रीडा मंडळ आणि आई एकविरा ग्रुप तळाघर यांनी यावर्षी ६० झाडांचे वृक्षारोपण रविवार (दि. २२) कालवा रोड, तळाघर ते निवी व पी एन पी तळाघर हायस्कूल परिसरात रोजी केले .

रोहा इंडस्ट्रियल असोसिएशनने सामाजिक बांधिलकीच्या माध्यमातून तळाघर गावाला ८० करंज वृक्ष देण्यात आले. या वृक्षांचे वृक्षारोपण परिसरात करण्यात आले असून त्यांची योग्य पद्धतीने निगा राखणे व उन्हाळ्यात पाण्याची घेणे आणि वनव्यापासून बचाव करण्यासाठी नेहमीच आई एकवीरा आणि ग्रामस्थ एकजुटीने वृक्षाचे संगोपन करण्याचे काम त्यांनी हाती घेतलेला आहे व तशा पद्धतीने त्याचे नियोजन केले जाते.

यावर्षी देखील ४०० हुन अधिक वृक्षांचे संगोपन करण्याचं मानस आहे असे मंडळाचे सल्लागार सचिन मोरे व व पोलीस पाटील मंगेश मोरे यांनी सांगितलं आहे . या वेळी मंडळाचे अध्यक्ष तसेच सर्व पदाधिकारी उपस्थित होते.



### मा. पवार मॅडम कोर्ट

## पनवेल येथील दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर पनवेल

दि.चौ.प्रोबेट क्र. ५७४/२०२५
निशाणी क्रमांक ७/ड
ने. ता. ३०/०६/२०२५

१) नयना तुकाराम कोरपे,
लग्नांनंतर सौ. पुर्वा महेंद्र राउल वय ४८ वर्षे, व्यवसाय –
–राहणार – श्री शारदा अर्पाटमेंट, फ्लॅट क्र. ३०३, निलयोग नगर, बी कॅबीन रोड, अंबरनाथ. पुर्व.
२) सौ. मिनाक्षी निलेश पाठारे, वय ५२ वर्षे, व्यवसाय
–राहणार– फ्लॅट क. ३५, गोपीनाथ नगर, कोथरूड, पुणे.
३) सौ. कल्पना संतोश जोरकर वय ५३ वर्षे,
–राहणार – घर क. १८३९–क, राम मंदीर जवळ, महाड.
....अर्जदार

**विरूध्द**

१) कोणी ही नाही.

### जाहीर नोटीस

१) मी अर्जदार क्र.१) नयना तुकाराम कोरपे, लग्नांनंतर सौ. पुर्वा महेंद्र राउल वय ४८वर्षे, अर्जदार क. २) सौ. मिनाक्षी निलेश पाठारे, वय ५२ वर्षे, ३) सौ. कल्पना संतोश जोरकर वय ५३ वर्षे हि त्यांच्या मुली आहेत. मयत कै. तुकाराम गणपत कोरपे, राहणार फ्लॅट क. १०१, डॉलफीन को. ऑप. हौ. सोसायटी, प्लॉट नं. २२, सेक्टर १३, नवीन पनवेल, पिन नं. ४१०२०६, मयत कै. तुकाराम गणपत कोरपे राहणार फ्लॅट क. १०१, डॉल्फीन को. ऑप. हौ. सोसायटी, प्लॉट नं. २२, सेक्टर १३, नवीन पनवेल, पिन नं. ४१० २०६, हे सर्व हया पत्यावर राहत आहे. मयत कै. तुकाराम गणपत कोरपे, यांचे पनवेल या दिनांक १४/०२/२०२२ रोजी पनवेल येथे निधन झाले. त्यांच्या निधनाची नोंद पनवेल महानगरपालिका येथे केलेली आहे. व पनवेल नगरपरिषदेनी त्यांच्या मृत्युचा दाखला दिलेला आहे मयत कै. तुकाराम गणपत कोरपे, यांच्या निधनाची नोंद पनवेल महानगरपालिका येथे केलेली आहे. यांच्या अधिकाऱ्याची सही व शिक्का आहे. यांनी त्यांच्या मृत्युचा दाखला दिलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| अ.क्र. | पत्ता | किंमत |
|---|---|---|
| १) | फ्लॅट क्र. १०१, डॉलफीन को. ऑप. हौ. सोसायटी, प्लॉट नं. २२, सेक्टर –१३, नवीन पनवेल, पिन नं.४१० २०६, | ४,२०,०००/– |
| २) | गट न. १०२/५, क्षेत्र १–५५–००, मौजे पुनाडे तर्फे नाते, तालुका–महाड. | |
| ३) | गट न. २३/१, क्षेत्र ०–२१–००, मौजे पुनाडे तर्फे नाते, तालुका–महाड. | |

वरील मिळकतीबाबत उक्त अर्जदारांनी वारस दाखला मिळण्याकरीता अर्ज दिला आहे. यापेक्षा सदरहू अर्जदार मयताचे वारसदार नव्हे असे कोणास समजाविण्याचे असेल आणि वरील मिळकतीच्या प्रोबेट अर्जानुसार वारस दाखल्याबाबत कोणाचे हक्क, अधिकार अथवा हितसंबंध अशी कोणत्याही प्रकारची तक्रार वगैरे असल्यास त्याने तशी लेखी हरकत हा जाहीरनामा प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांच्या आंत या मे. कोर्टात सादर करावी. दिलेल्या मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास या अर्जदारास यांचे विनंती प्रमाणे प्रोबेट अर्जानुसार वारस दाखला दिला जाईल व त्यांनतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही. याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आज दि. १२/०६/२०२५ रोजी माझ्या सहीने व मे. कोर्टाचे शिक्यानिशी दिली.

**सही/–**
**क. लिपीक**
**दि. न्या. व. स्तर पनवेल**

**सही/–**
**सहा. अधिक्षक**
**दि. न्या. व. स्तर पनवेल**

# माथेरानमध्ये मोफत हृदयरोग तपासणी शिबिर



**माथेरान : बातमीदार**

माथेरान मधील नागरीकांसाठी भारतीय जनता पार्टी माथेरान शहर आणि शुश्रुषा हार्ट केयर सेंटर आणि स्पेशालिटी हॉस्पिटल यांच्या संयुक्त विद्यमाने महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना अंतर्गत मोफत हृदयरोग तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.माथेरान भारतीय जनता पार्टीचे शहर उपाध्यक्ष सुभाष भोसले यांनी भारतीय जनता पार्टी महिला तालुका अध्यक्षा नम्रता नितीन कांदळगावकर यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने माथेरान मधील नागरिकां साठी येथील गुलशन हॉटेल येथे मोफत हृदयरोग तपासणी शिबिराचे आयोजन केले होते.शुश्रुषा हार्ट केयर सेंटर आणि स्पेशालिटी हॉस्पिटलचे तज्ञ डॉक्टर संजय तारळेकर (एम.डी,डी.एम कार्डिओलॉजिस्ट) यांनी शिबिरात सहभागी झालेल्या सर्व नागरिकांची तपासणी केली.या शिबिरासाठी प्रमुख पाहुणे म्हणून भारतीय जनता पार्टीचे रायगड जिल्हा अध्यक्ष अविनाश कोळी,कर्जत मंडल तालुका अध्यक्ष नरेश मसणे, रायगड जिल्हा सचिव मंगेश म्हसकर, माजी तालुका अध्यक्ष राजेश भगत,माथेरान शहर अध्यक्ष प्रविण सकपाळ, माजी अध्यक्ष विलास पाटील, माजी उपनगराध्यक्ष आकाश माथेरान भारतीय जनता पार्टीच्या महिला पदाधिकारीदेखील या वेळी उपस्थित होत्या.

# जागतिक अमली पदार्थविरोधी दिनाच्या निमित्ताने महाड पोलिसांची जनजागृती रॅली



**महाड : प्रतिनिधी**

२० जून या जागतिक अमली पदार्थ विरोधी दिनाच्या निमित्ताने रायगड जिल्हा पोलीस विभागामार्फत अमली पदार्थ व व्यसना धीनता याबाबत विविध जनजागृतीपर कार्यक्रमांचे आयोजन केले जात असून याच अनुषंगाने महाड शहर पोलिसांमार्फत मंगळवार २६ जून २०२५ रोजी शालेय विद्यार्थ्यांच्या साथीने अमली पदार्थ विरोधी जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले होते.

सशक्त भारताचा एकच नारा तंबाखूला देऊ नका थारा, दारू पळवा गाव वाचवा,मादकद्रव्याची गोळी करी जीवनाची होळीअशा आशयाचे फलक हातात घेऊन रायगड शिक्षण प्रसारक मंडळाच्या कै. अण्णासाहेब सावंत माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थी विद्यार्थीनी व शिक्षक या रॅलीमध्ये सहभागी झाले होते. विद्यालयापासून निघालेली ही रॅलीचवदारतळे येथे आल्यानंतर तिची सांगता करण्यात आली.

नागरिक व विशेष करून तरुणांना नशाखोरीपासून परावृत्त करण्यासाठी रायगड जिल्हा पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांच्या मार्गद र्शनाखाली जिल्ह्यामध्ये अमली पदार्थ विरोधी मोहीम व जनजागृती राबविण्यात येत असून याच अनुषंगाने महाडमध्ये या रॅलीचे आयोजन करण्यात आल्याचे महाड शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संतोष जाधव यांनी याप्रसंगी बोलताना सांगितले. रॅलीमध्ये त्यांच्या समवेत महाड शहर पोलीस ठाणे तर्फे सहाय्यक पोलीस निरीक्षक शिवराम खाडे, पीएसआय रवी गर्जे, सहाय्यक फौजदार प्रमोद लांगे, हवालदार गणेश पवार, प्रतीक कदम,एस एस गुरव, धनराज आंधळे,राहुल येळे तसेच विद्यालयाचे शिक्षक व कर्मचारी सहभागी झाले होते.

## मुंबई–गोवा महामार्गावर खांबनजीक अपघातात एकजण ठार : तिघे जखमी

**धाटाव : प्रतिनिधी**

मुंबई गोवा महा–मार्गावर सोमवारी रात्री दीड च्या सुमारास खांब हद्दीत एच पी पेट्रोल पंप समोर सुजुकी कार चालकाने उभ्या असलेल्या ट्रेलर ला धडक मारून भीषण अपघात झाला हा अपघात एवढा गंभीर होत की या अपघातात १ जणांचा मृत्यू झाला असून ३ जण गंभीर जखमी झाले आहेत .



याबाबत पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार कोलाड पोलीस ठाणे हद्दीत सोमवारी पहाटे दीड च्या सुमारास सिद्धेश शिंदे खडक पाडा, कल्याण हे आपल्या सुजूकी सियाज गाडीने चिपळूण ते कल्याण येत असताना मौजे खांब गावच्या हद्दीत एच पी पेट्रोल पंप समोर उभ्या असलेल्या ट्रेलरला मागील बाजूस ठोकर मारून अपघात झाला या अपघातात आदित्य दिपू वर्मा वय ३८ रा.कमला देवी कॉलेज हेरीटेल ठाणे हे मयत झाले आहेत.तर १)/निलेश राधानी वय २५ रा कल्याण,२) सिद्धेध योगेश शिंदे वय २६वर्षे खडक पाडा फिर्यादि अमित विजय करपे हे तिघेही जखमी झाले आहेत याबाबत कोलाड पोलीस ठाणे येथ गुन्हा दाखल करण्यात आला असुन कोलाड सपोनि नितीन मोहिते यांच्या मार्गदर्शनाखाली अधिक तपास गायकवाड करीत आहेत.

## निवडक



### भाऊसाहेब ढोले सहाय्यक पोलीस आयुक्त

**पनवेल :** नवी मुंबई पोलीस ठाणे अंतर्गत परीमंडळ २ पनवेल येथील सहाय्यक पोलीस आयुक्तपदी भाऊसाहेब ढोले यांची नियुक्ती करण्यात आली असून त्यांनी नुकताच पदभार स्वीकारला आहे. या पूर्वी असलेलले सहाय्यक पोलीस आयुक्त अशोक राजपूत यांची आर्थिक गुन्हे शाखा नवी मुंबई येथे बदली करण्यात आली असून त्यांच्या जागी नवी मुंबई आर्थिक गुन्हे शाखेत कार्यरत असणारे सहाय्यक पोलीस आयुक्त भाऊसाहेब ढोले यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांनी पदभार स्वीकारताच विविध राजकीय पक्षाचे पदाधीकारी, सामाजिक कार्यकर्ते, पत्रकार आदींनी त्यांची भेट घेऊन त्यांना शुभेच्छा दिल्या आहेत.

### रोडपाली येथून एक जण बेपत्ता



**पनवेल :** आराम करण्यासाठी रोडपली येथील कॅपेसिटी बिल्डिंगच्या काम चालू असलेल्या पत्र्याच्या रूपामध्ये जातो असे सांगून एक इसम कळंबोली येथून गेला तो अद्याप सदर ठिकाणी न पोहचल्याने तो हरवल्याची तक्रार कालम्बोली पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. राजकुमार अनुकुल मंडल (वय ५२ रा.रोडपली) अंगाने मध्यम, रंग गोरा, उंची अंदाजे पाच फुट, चेहरा सरळ, नाक सरळ, डोक्याचे केस काळे पांढरे, अंगात काळे शर्ट, काळी पॅन्ट, पायात काळी चप्पल आहे. त्यांना भाषा बंगाली हिन्दी येते. या व्यक्तीबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी कळंबोली पोलीस ठाणे किंवा मपोहवा सविता पाटील (९८३४४४०६३८) येथे संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### कारने पादचारी महिलेला उडवले

**पनवेल :** कामोठे वसाहतीमध्ये सेक्टर ६ ए येथील सरोवर हॉटेलसमोर एका भरधाव मोटारीने पादचारी महिलेला उडवले. त्यानंतर रस्त्याकडेला उभ्या असणाऱ्या दोन वाहनांना मागून धडक दिली. या घटनेलमध्ये महिलेच्या पायाला गंभीर दुखापत झाली आहे. या अपघातानंतर रहिवासी जमा झाल्याने मोटारचालकाने आणखी वेगाने तेथून पळून जाण्याचा प्रयत्न केला. या प्रयत्नात एमएनआर विद्यालयासमोर आणखी एका दुचाकीला धडक दिली. त्यानंतर त्याला पकडून रहिवाशांना चोप दिला आणि कामोठे पोलिसांच्या ताब्यात दिले. जखमी महिलेला कामोठे येथील महात्मा गांधी मिशन रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

### नवी मुंबईत 'उत्सव कवितांचा'

**नवी मुंबई :** सिवुड्स येथील सांस्कृतिक क्षेत्रात कार्य करणाऱ्या कवी कुसुमाग्रज सार्वजनिक वाचनालय संस्थेच्या महिला सभासदांनी उत्सव कवितांचा हा कार्यक्रम मुंबई नरिमन पॉईंट येथील नामवंत अशा नॅशनल सेंटर ऑफ परफॉरिंग आर्ट्स म्हणजेच एनपीसीएच्या सभागृहात आयोजित केला आहे. २८ जून २०२५ रोजी सायंकाळी ६.३० वाजता सुरू होणार आहे. प्रज्ञा ललिंगकर, पल्लवी देशपांडे, क्षमा खडतकर, शितल देशपांडे, सायली देगवेकर व सुप्रिया देशपांडे हे मान्यवर कलाकार भाग घेणार आहेत. नवी मुंबईतील कुसुमाग्रज पहिली संस्था असून ज्या संस्थेचा एनसीपीएमध्ये कार्यक्रम होणार आहे. हा नवी मुंबईतील कलाकारांना अभिमानाचा क्षण असल्याचे संस्थेचे कार्यवाह ललित पाठक यांनी माहिती देताना सांगितले.

### नेरूळमध्ये शाहू महाराज जयंती उत्सव

**नवी मुंबई :** सामाजिक न्याय, शिक्षण आणि समतेचे महान प्रतीक असलेल्या छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांची जयंती यंदा नेरूळमध्ये मोठ्या उत्साहात साजरी होणार आहे. या कार्यक्रमाचे आयोजन समस्त 'कोल्हापूर जिल्हा रहिवासी मुंबई महानगर संघटने'तर्फे करण्यात आले आहे. २६ जून रोजी सायंकाळी ५ वाजता आगरी-कोळी संस्कृती भवन, प्लॉट १२, सेक्टर २४, पाम बीच रोड नेरुळ, नवी मुंबई येथे हा सोहळा पार पडणार आहे. ऐक्य, परस्पर प्रेम, विश्वास आणि चिकाटी या मूल्यांचा वारसा जपणाऱ्या या जयंती उत्सवात विविध क्षेत्रांतील मान्यवरांची उपस्थिती लाभणार आहे. कार्यक्रमात सामाजिक कार्यकर्त्यांचा सत्कार, मार्गदर्शनपर भाषणे आणि प्रेरणादायी विचारांचे सादरीकरण होणार आहे. या उत्सवाकरिता सर्व उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.

# उरणमध्ये अतिसार प्रतिबंधक मोहीम


## १६ जून ते ३१ जुलैदरम्यान जनजागृती

**उरण : बातमीदार**

अर्भक मृत्यूदर व बाल मृत्यूदर कमी करणे हे राष्ट्रीय आरोग्य अभियानाचे एक महत्त्वाचे उद्दिष्ट आहे. रजिस्ट्रार जनरल ऑफ इंडीयाच्या नमुना नोंदणी प्रणालीनुसार (२०१७-१९) देशात पाच वर्षापर्यतच्या बालकांच्या मृत्यूमागे अतिसार हे प्रमुख कारण असून ४.८ टक्के बालके अतिसारामुळे दगावतात.

अतिसाराच्या व्यवस्थापनासाठी प्रतिबंध हा सर्वोत्तम उपाय आहे. अतिसाराच्या प्रतिबंधा करिता स्वच्छ व सुरक्षित पिण्याचा पाण्याचा वापर, स्वस्छता, साबण आणि पाण्याने हात धुणे, निव्वळ स्तनपान आणि इष्टतम पूरक आहारसह पुरेसे पोषण, चांगली वैयक्तिक आणि अन्न स्वस्छता, संसर्ग प्रतिबंधाबददल आरोग्य शिक्षण आणि लसीकरणाचे महत्व यांचा समावेश होतोः याव्यतिरिक्त, ओआरएस आणि झिंक गोळया हे आजार लवकर बरे होण्यात अणि प्रतिबंधात्मक उपायांद्वारे मृत्यू टाळण्यात महत्वपूर्ण भुमिका बजावतात.

या अनुषंगाने केंद्र शासनाच्या आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाकडून अतिसार नियंत्रण कार्यक्रमाचे




नांव बदलून STOP Diarrhoea Campaign असे करण्यात आले आहे. दिनांक १६/०६/२०२५ ते ३१/०७/२०२५ या कालावधीत सदर अभियान राबविणेबाबत सर्व शासकीय यंत्रणाना कळविण्यात आले आहे. याचे सन २०२४ चे घोषवाक्य हे अतिसारावर करा मात, स्वच्छता आणि ओआरएसची घेऊनी साथ असे आहे.

आपल्या रायगड जिल्हयात तसेच उरण तालुक्यात या माहिमे अंतर्गत ओआरएस आणि झिंकचा वापर, शुद्ध पिण्याच्या पाण्याचा वापर, माहिती, शिक्षण अणि संपर्क (IEC) तसेच सामाजिक वर्तन बदल संवाद (SBCC) यावर लक्ष केंद्रित करुन दोन महिन्याच्या कालावधीत सर्व भागीधारांच्या सहकार्याने विविध उपक्रम राबवावचे आहेत.

नागरिकांनी, विविध सामाजिक संस्था संघटनानीं,पर्यावरण प्रेमीनी या मोहिमेत, अभियानात सहभागी होऊन या रोगाविरोधात मोठया प्रमाणात जनजागृती करावी असे आवाहन उरण तालुका आरोग्य अधिकारी डॉ. राजेंद्र इटकरे यांनी केले आहे. शासकीय स्तरावर या मोहिमे विषयी, अभियाना विषयी जनजागृती करण्यात येत असल्याची माहिती डॉ. राजेंद्र इटकरे यांनी दिली आहे.



# पनवेलमध्ये सोमनाथ ज्योतिर्लिंग दर्शन सोहळा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

श्री श्री रविशंकर प्रणित आर्ट ऑफ लिव्हिंग फाउंडेशनच्या वतीने राज्यभर सोमनाथ ज्योतिर्लिंग यात्रा आयोजित करण्यात आली आहे. ही यात्रा १५ जून ते ६ जुलैदरम्यान महाराष्ट्रभर होणार आहे. पनवेलमध्ये हजार वर्षानंतर प्रथमच मूळ ज्योतिर्लिंग दर्शन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. सोमवारी शहरातील आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह रुद्र पूजा आणि दर्शन सोहळा आयोजित करण्यात आला होत.

या सोहळ्याला भारतीय जनता पक्ष उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, पनवेल महानगरपालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर, शकुंतला ठाकूर, वर्षा ठाकूर, अर्चना ठाकूर, मयुरेश नेतकर, भाजपचे शहराध्यक्ष सुमित झुंजारराव, गव्हाण पंचायत समितीच्या माजी सदस्य रत्नप्रभा घरत, माजी नगरसेवक मदन कोळी, अमरीश मोकल, चिन्मय समय, प्रीतम म्हात्रे, माजी नगरसेविका दर्शना भोईर, स्वाती कोळी यांच्यासह भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# पनवेल-पंढरपूर सायकल वारी यशस्वी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सायकल चालवा-पर्यावरण वाचवा हा संदेश देत २०, २१, २२ जून २०२५दरम्यान पनवेल ते पंढरपूर पर्यावरणपूरक सायकल वारी माजी खासदार रामशेठ ठाकूर यांच्या विशेष सहकार्याने झाली.

राजकिशोरी लांडगे यांनी या वारीचे नेतृत्व केले. विविध वयोगटातील २० महिला पुरुष रायडर्स यात सहभागी झाले होते तर राजनंदिनी रसाळ व सानिया रसाळ या नववीतील विद्यार्थिनी व ६३ वर्षीय उल्का धुरी या महिला रायडर्सचा यात सहभाग होता. २१ तारखेला सकाळी ७ वाजता प्रस्थान होऊन खोपोली, लोणावळा, तळेगाव दाभाडे, देहूमार्गे पुणे मुक्काम, २२ ला पुणे, लोणी काळभोर, कुरकुंभमार्गे इंदापूर मुक्काम, २२ रोजी सकाळी निघून अकलूजमार्गे पंढरपूर असा जवळपास ३४० किमीचा प्रवास या सायकलिस्टने केला.



चंद्रभागा स्नान करून विठुरायाच्या कळसाचे दर्शन, खेडलेकर आश्रम येथे पुरणपोळीच्या सुग्रास भोजनाने वारीची सांगता झाली. या वारीमध्ये विलास कळमकर, एम एस शेलार, मारुती कदम, सोनल भोमे, उल्का धुरी, सानिया रसाळ, राजनंदिनी रसाळ, संगीता जाधव, डॉ. हरिओम म्हात्रे, शुभम गायकर, दीपक नार्वेकर, श्रीकांत काटकर, धनंजय ढाकिते, भुजंग लोखंडे, राकेश दुर्वे, किशोर नारकर, शशिकांत रेडेकर, भगवान जाधव, महेश खाकरे पाटील, विवेक आपटे यांनी सहभाग घेतला.

# प्रा. विनायक लोहार यांना पीएचडी पदवी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



शिक्षण क्षेत्रातील प्रदीर्घ कार्यानुभव आणि सृजनशीलतेचा परिपाक असलेले आदर्श शैक्षणिक समूह संचलित श्री. बापूसाहेब डी.डी. विसपुते कॉलेज ऑफ एज्युकेशनचे ज्येष्ठ प्राध्यापक व विभागप्रमुख प्रा. विनायक विष्णू लोहार यांना मुंबई विद्यापीठाची पीएच.डी. पदवी प्रदान करण्यात आली आहे.

रायगड जिल्ह्यातील माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासाकरिता स्वयं अनुदेशन कार्यक्रमाची निर्मिती व त्याच्या परिणामकारकतेचा अभ्यास या मौलिक आणि उपयोजनशील विषयावर त्यांनी सखोल व संलग्न संशोधन केले. या संशोधनकार्यासाठी त्यांना डॉ. सुनिता लोंढे यांचे मार्गदर्शन लाभले. सदर मौखिक परीक्षेस सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या शिक्षणशास्त्र विभागाच्या विभागप्रमुख डॉ. गीता शिंदे विषयतज्ज्ञ म्हणून उपस्थित होत्या, तर मुंबई येथील डॉ. करुणा सिन्हा या परीक्षेच्या चेअरपर्सन म्हणून उपस्थित होत्या.

प्रा. विनायक लोहार हे एम.ए. (समाजशास्त्र व भूगोल), एम.एड., सेट, नेट, डी.एस.एम., जी.डी.सी. अँड ए अशा बहुविध शैक्षणिक पात्रता संपन्न असून, आता त्यांनी 'विद्यावाचस्पती' ही शिक्षणशास्त्रातील सर्वोच्च शैक्षणिक पदवी प्राप्त करून आपल्या ज्ञानयात्रेत एक मानाचा टप्पा गाठला आहे. त्यांच्या या यशाबद्दल आदर्श शैक्षणिक समूहाचे चेअरमन धनराजजी विसपुते, संचालिका संगीता विसपुते तसेच महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. सीमा कांबळे यांनी मनःपूर्वक अभिनंदन करून त्यांच्या पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या.

# खारघर येथील गोल्डन कॉईन शॉपबाबत राज्य उत्पादन शुल्क विभागाला निवेदन



**खारघर : रामप्रहर वृत्त**

खारघर येथील गोल्डन कॉईन वाईन मार्ट या वाईन शॉप संदर्भात आमदार प्रशांत ठाकूर यांनी राज्य उत्पादन शुल्क विभागाकडे निवेदन दिले आहे.

या निवेदनात म्हटले आहे की, खारघर येथील नागरिकांचा सुरूवातीपासूनच खारघर मध्ये दारू दुकाने व दारू बार येण्यास सक्तविरोध आहे. खारघर मध्ये दारूबंदी विषयी अनेक आंदोलने, निदर्शने झालेली आहेत. जानेवारी २०२५ पासून संघर्ष संस्था, खारघर यांच्या माध्यमातून दारूमुक्त खारघर शहर घोषित करावे म्हणून शासनाकडे मागणी केली असून शासनाचे लक्ष वेधण्यासाठी जन आंदोलन सुरू केले आहे.

गोल्डन कॉईन वाईन मार्ट हे नवीन वाईन शॉप सेक्टर ६, खारघर येथे उघडण्यात आले आहे. वाईन शॉपला सोसायटी किंवा पनवेल महानगरपालिकेची कोणतीही परवानगी घेतली नसल्याचे समजते. वाईन शॉपला परवानगी दिली असल्यास ती रद्द करण्यात यावी, अशी येथील नागरिकांची मागणी आहे. खारघर येथील गोल्डन कॉईन वाईन मार्ट या वाईन शॉपला देण्यात आलेली परवानगी रद्द करण्यात यावी.

निवेदन देतेवेळी आमदार प्रशांत ठाकूर यांच्यासह प्रवीण पाटील, ब्रिजेश पटेल, डॉ. वैभव बदाणे, त्रिवेणी सालकर, किर्ती मेहरा, संतोषी चौहान, जुमा चक्रवती, कॅ.कलावत, तुकाराम कंठाले, संदीप पाटील, मोहन म्हात्रे, शैलेंद्र त्रिपाठी आदी उपस्थित होते.

# रामशेठ ठाकूर विद्यालयात आंतरराष्ट्रीय योग दिवस

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयात शनिवारी (दि.२१) आंतरराष्ट्रीय योग दिवस साजरा करण्यात आला होता. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांसोबत शिक्षकांनीही सहभाग नोंदवला.

या दिवशी योगा शिक्षक म्हणून श्री. अंबिका योग कुटिर, नेरुळ शाखेचे योगा शिक्षक लाभले. या कार्यक्रमाची सरुवात प्रार्थनेने करण्यात आली होती. त्यानंतर प्रशिक्षित योग शिक्षकांनी विविध योगासने, प्राणायाम व ध्यान याचे प्रात्यक्षिक विद्यार्थ्यांना व शिक्षकांना करुन



दाखवले. त्याच बरोबर योगाचे शारीरिक व मानसिक आरोग्यावर होणारे फायदे याविषयी मार्गदर्शनही करण्यात आले.

या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये योगाविषयी जागरुकता वाढली असून, नियमित योगाभ्यासाचा संकल्पन अनेकांनी केला. संपूर्ण कार्यक्रम अत्यंत शिस्तबध्द व प्रेरणादायक ठरला. कार्यक्रम व्यवस्थितपणे पार पडण्यासाठी प्राचार्या निशा नायर यांचे मार्गदर्शन लाभले.

# फुंडे विद्यालयात लोकनेते दि.बा. पाटील यांचा स्मृतीदिन



**उरण : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेचे उरण तालुक्यातील फुंडे येथील तुकाराम हरी वाजेकर उच्च माध्यमिक विद्यालयात महाराष्ट्र राज्याचे माजी विरोधी पक्षनेते, माजी खासदार लोकनेते दि.बा. पाटील यांचा १२ वा स्मृतिदिन झाला.

लोकनेते दि.बा.पाटील साहेब यांच्या प्रतिमेचे पूजन मा.शिवदास पोटे लेखाधिकारी रा.जि.प.अलिबाग, विद्यालयाचे चेअरमन कृष्णाजी कडू, विद्यालयाचे प्राचार्य बी.बी. साळुंखे, उपमुख्याध्यापिका एस.डी. थोरात, पर्यवेक्षिका एस.एम.बाबर, एस.एस. पाटील, लेखनिक नवनीत ठाकूर व उपस्थित शिक्षक वृंदाच्या हस्ते झाले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत सां. वि.प्रमुख एच.एन.पाटील यांनी केले त्या नंतर विद्यालयातील प्राजक्ता कडू ह्या विद्यार्थिनीने दि.बा.पाटलांच्या नावाचे होणार विमानतळ या गीताचे सादरीकरण केले.

विद्यालयातील क्रीडा शिक्षक डी.डी. पाटील व ज्येष्ठ शिक्षक भोपी जे.सी. यांनी दि.बा.पाटील साहेबांचे सामाजिक, शैक्षणिक व राजकीय कार्ये विषद केले. रायगडचा राजा, प्रकल्प ग्रस्तांचा तारणहार, भूमिपुत्राचा मार्गदर्शक, कर्तुत्व, नेतृत्व आणि चारीत्रत्व कसे असावे याचे मूर्तिमंत उदाहरण म्हणजे लोकनेते दि.बा.पाटील साहेब त्यांनी शेतकरी-कष्टकऱ्यांसाठी सारे आयुष्य झिजवले. रायगड आणि नवी मुंबईतील सामान्य आगरी जनतेबरोबर त्यांचे जिव्हाळ्याचे संबंध होते. दि.बा.पाटील साहेबांची विधिमंडळातील अभ्यासपूर्ण भाषणे गाजली विविध उदा. देत त्यांचे कार्य सांगितले.





**उरण : संकल्प से सिद्धी कार्यक्रमात जसखार ग्रामपंचायतीचे माजी सरपंच दामुशेठ घरत यांना आदर्श सरपंच पुरस्कार मिळाल्याने त्यांचे कर्जत मंडळ अध्यक्ष राजेश भगत यांनी विशेष सत्कार करून अभिनंदन केले. या वेळी भाजप पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.**

# अलिबागमध्ये वीज देयक वितरणाचा गोंधळ

**अलिबाग : प्रतिनिधी**

महावितरणकडून जून महिन्यातील वीज देयके १५ जूनपर्यंत प्राप्त होणे अपेक्षित असतांना देयकांची मुदत संपायला आली तरी ग्राहकांना ही देयके मिळाली नाहीत. त्यामुळे महावितरणकडून तातडीने वीज देयकांचे वितरण करण्यात यावे, अशी मागणी केली जात आहे.



अलिबाग परिसरात दर महिन्याच्या तीन ते चार तारखेला वीज देयकांसाठी मीटर रिडींग घेतले जाते. नंतर १० तारखेपर्यंत वीज देयके तयार केली जातात. ज्यांचे वितरण १३ ते १४ तारखेपासून सुरू होत असते यंदा मात्र २३ जून तारीख उजाडली तरी वीज वितरण कंपनीचे कार्यालय असलेल्या चेंढरे ग्रामपंचायत हद्दीत अनेक ग्राहकांना वीज देयक मिळालेली नाहीत. देयकेच प्राप्त न झाल्याने, भरणा होऊ शकलेला नाही. आता अशा ग्राहकांविरोधात महावितरणकडून वीज तोडणी करण्याची कारवाई सुरू करण्यात आली आहे. त्यामुळे ग्राहक आणि महावितरणचे कर्मचारी यांच्यात वादावादीचे प्रकार घडत आहेत.

वीज देयके वितरण ठेकेदारांमार्फत केले जात होते. या ठेकेदारांकडून दोन महिन्यापासून वीज देयकांचे वितरण योग्य प्रकारे होत नाही. त्यामुळे ग्राहक आणि महावितरण यांच्यात वाद निर्माण होत आहेत. ज्या ग्राहकांना वीज देयके मिळाली नाहीत त्या ग्राहकांनी कार्यालयातून वीज देयके घेऊन जाणे अपेक्षित असल्याचे महावितरणच्या अधिकाऱ्यांकडून सांगितले जात आहे. वीज देयके मिळाली नाहीत तरी मोबाईलवर एसएमएस आले असल्याचे सांगतले जात आहे. त्यामुळे ग्राहकांमध्ये संताप आहे.

सोलार रुफ टॉप योजनेचे ग्राहकांना ऑनलाईन पध्दतीने वीज बीले दिली जातात, मात्र ही जून महिन्याची वीज बीले त्यांना अद्याप मिळालेली नाहीत. मीटर रिडींग घेतले जात नसल्याने सोलार रुफ टॉप योजनेच्या लाभार्थ्यांना वीज देयके दिली नसल्याचे माहिती महावितरणच्या सूत्रांकडून देण्यात आली.

### प्रश्न लवकरच निकाली

वीज देयके मिळाली नसल्याच्या ग्राहकांच्या तक्रारी आल्या आहेत. त्यामुळे वीज देयके वितरण करणाऱ्या ठेकेदारांची बैठक घेऊन त्यांना तातडीने वीज देयके वितरीत करण्याच्या निर्देश दिले आहेत. हा प्रश्न लवकरच निकाली निघेल, असे महावितरण अलिबाग कार्यालयातून सांगण्यात आले.

# गुगल मॅपमुळे मलखंडवाडी गावात घुसला अवजड टँकर

**धाटाव : प्रतिनिधी**

रोहा औद्योगिक वसाहतीतील रेपटाकोर्स येथे एमआयडीसीची हद्द समाप्त होते या कारखाना लगतच मलंखडवाडी हे गाव आहे. या गावात ड्रायव्हरने गुगल मॅपचा वापर व्यवस्थित न केल्यामुळे व एमआयडीसीची हद्द फलक नसल्यामुळे थेट ॲसिटिक ॲसिड केमिकलने भला मोठा भरलेला टँकर व वजनदार सिमेंट पाईपाने भरलेला ट्रक गावात असल्याने वाहतुकीची कोंडी झालीच, परंतु या टँकरने पाण्याचे लाईन, ग्रामस्थांनी गरबा दांडिया खेळण्यासाठी उपलब्ध केलेल्या मैदान व रस्त्याचे साईड पट्टीची पूर्णतः दुर्दशा झालेले आहे.

युनिकेम कंपनीत ॲसिटिक ॲसिड केमिकलने भरलेला टँकर वाशी येथून आलेला होता, परंतु त्या ड्रायव्हरला एक्सेल स्टॉप वरून युनिकेम कंपनीचा कॉर्नर समजला नाही त्यामुळे थेट तो मलखंडवाडी गावावरुन वाशी गावाला वळसा मारून मार्गे दाखवत असल्यामुळे त्यांनी गाडी मलंखडवाडी गावात भरलेली १२ टायरची गाडी टाकली असता येथील ग्रामस्थांनही ड्रायव्हरला विचारला गेले असता या ड्रायव्हरला ग्रामस्थांनी मदत केली. तेथे दोन फराना मागवण्यात आले तब्बल नऊ तासानंतर या गाडीला मुख्य मार्गावर आणण्यात आले. दुसऱ्या दिवशी आर्यन एक्सचेंज कारखान्यात साताऱ्याहून सिमेंटचे पोल घेऊन आलेली गाडी सुद्धा याच गावात अडकून पडली तिथेसुद्धा ग्रामस्थांनी मदत करून तब्बल चार तासानंतर गाडी रिव्हर्स घेऊन कंपनीत पाठवण्यात आली.

हा रस्ता अनेक गावांना जोड रस्ता आहे. हजारो नागरिक ये-जा करीत असताना मात्र सततच्या चुकीच्या पद्धतीने गावात गाड्या घुसल्यामुळे नागरिकांना असता त्याठिकाणी थांबावं लागलं नाहक त्रास सहन करावा लागला. त्यामुळे एमआयडीसी ने तात्काल खबरदारीचा उपाय म्हणून एमआयडीसी हद्द समाप्तीचे फलक ठिकठिकाणी लावण्याची गरज आहे, अशी मागणी नागरिक करत आहे.

# नवनीत फाउंडेशनकडून शाळांना टीव्ही भेट

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यात नवनीत फाउंडेशन ग्रामीण आणि आदिवासी भागातील शैक्षणिक वाटचालीसाठी मदत करीत असते. कर्जत पंचायत समितीचे गटशिक्षण अधिकारी अनंत खैरे यांच्या माध्यमातून नवनीत फाउंडेशनकडून शाळांना डिजिटल करण्यासाठी अँड्रॉइड टीव्ही संच भेट देण्यात येतात.



कर्जत तालुक्यातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेत आणि डिजिटल शिक्षण पद्धतीत भर घालण्यासाठी नवनीत फाउंडेशन मुंबई यांच्या वतीने दोन शाळांना प्रत्येकी दोन टीव्ही संच प्रदान करण्यात आले आहेत. हे संच पंचायत समिती कर्जत तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी अनंत खैरे यांच्या विशेष शिफारशीनंतर देण्यात आले. नेरळ येथील विद्यामंदिर नेरळ शाळेला नवनीत फाउंडेशन मुंबईतर्फ दोन टीव्ही संच भेट म्हणून देण्यात आले.

हे संच विद्यार्थ्यांना डिजिटल शिक्षणात उपयोगी पडतील व त्यांच्या ज्ञानात भर घालतील. तसेच भडवळ येथील कोंडीराम शेंडे (पाटील) माध्यमिक विद्यालय या शाळेलादेखील नवनीत फाउंडेशन मुंबईतर्फे नववी व दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी दोन टीव्ही संच बसविण्यात आले.

या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना अधिक प्रभावी पद्धतीने अभ्यास करता येणार असून डिजिटल साधनांचा वापर करून नवनवीन शैक्षणिक उपक्रम राबवता येणार आहेत. या विद्यालयाचे मुख्याध्यापक बोरसे यांनी नवनीत फाउंडेशन यांचे आभार मानले आहेत. तर या वेळी गटशिक्षणाधिकारी खैरे यांनी अशा उपक्रमामुळे ग्रामीण भागातील शाळांमध्ये डिजिटल शिक्षणाचा पाया अधिक मजबूत होईल, असा विश्वास स्थानिकांनी व्यक्त केला आहे.

# डॉ. वैभव भगत अध्यक्षपदी

**अलिबाग : प्रतिनिधी**

वैद्यकीय क्षेत्रात त्याचबरोबर सामाजिक क्षेत्रात अग्रेसर असलेल्या अलिबाग मुरूड मेडिकल असोसिशनच्या अध्यक्षपदी अलिबाग येथील डॉ. वैभव भगत यांची निवड करण्यात आली आहे.



अलिबाग कुरूळ येथिल सुरुची हॉटेल मधे कोअर कमिटीची बैठक झाली. या वेळी रायगड मेडिकल असोसिएशन चे माजी अध्यक्ष डॉ. निशिगंध आठवले, अलिबाग मुरुड मेडिकल असोसिएशनचे माजी अध्यक्ष डॉ. महेंद्र दोषी, डॉ. संदेश पाटील, डॉ. आशिष भगत, डॉ. मकरंद आठवले, डॉ. रवी म्हात्रे, डॉ. राजेंद्र मोकल, डॉ. अनघा भगत, डॉ. मयुर कल्याणी, डॉ. उज्वल जैन, डॉ. गणेश गवळी यांच्या मार्गदर्शनाखाली नवीन कार्यकारणी निवडण्यात आली. यावेळी अध्यक्षपदी डॉ. वैभव भगत यांची निवड करण्यात आली. मावळत्या अध्यक्षा डॉ. सुनिता पाटील यांनी डॉ. वैभव भगत यांच्याकडे पदभार सुपूर्द केला.

असोसिएशनच्या उपाध्यक्ष पदी डॉ. अमेय केळकर आणि डॉ. अमित बेनकर, सचिव पदी डॉ. ओमकार पाटील, सहसचिव पदी डॉ. भूषण शेळके आणि डॉ. सुलतान हसवारे खजिनदार पदी डॉ. वैजेश पाटील, सहखजिनदार पदी डॉ. अभिराज पाटील आणि डॉ. प्रांजली पाटील, स्पोर्टस् सेक्रेटरी डॉ. आदेश मोकल, डॉ. पल्लवी शेळके, कल्चरल सेक्रेटरी डॉ. समीर धाटावकर, डॉ. सोनाली नाईक, ऑर्गनायझर सेक्रेटरी डॉ. निशिकांत ठोंबरे, डॉ. रश्मी गंभीर यांची सर्वानुमते निवड करण्यात आली.

# माथेरान नागरी सहकारी पतसंस्थेचा वर्धापन दिन

**माथेरान : प्रतिनिधी**

माथेरानमधील गोरगरीब जनतेसाठी १९३९ साली वीर हुतात्मा भाई कोतवाल यांनी सुरू केलेली माथेरान नागरी सहकारी पतसंस्थाचा ८६ वा वर्धापन दिन येथे उत्साहात झाला. वेळी पतसंस्थेच्या समोरील जागेत वृक्षारोपण करण्यात आले. तसेच मुख्य महात्मा गांधी रस्त्यावर पर्यटकांना बसण्यासाठी थ्री चेअर्स आणि बेंचेस बसविण्यात आले.





माथेरान नागरी सहकारी पतसंस्था येथील गोरगरीब जनतेला आधार देणारी संस्था असून प्रत्येकवर्षी संस्थे मार्फत वर्धापन दिनाचे औचित्य साधून येथे नवनवीन उपक्रम राबविले जातात.यंदाच्या वर्षी माथेरान नागरी सहकारी पतसंस्थेचा ८६वा वर्धापन दिन उत्साहात साजरा करण्यात आला. संस्थेच्या कार्यालयात दरवर्षी प्रमाणे श्रीसत्यनारायणाच्या पूजेचे आयोजन करण्यात आले होते. त्यानंतर संस्थेच्या समोर असलेल्या जागेत सदस्यांच्या हस्ते पाच झाडांचे वृक्षारोपण करून त्यांचे संवर्धन करणे तसेच माथेरानच्या मुख्य बाजारपेठेतील महात्मागांधी रस्त्यावर पर्यटकांना बसण्यासाठी थ्री चेअर आणि बेंचेस या ठिकाणी बसविण्यात आले असून याचे लोकार्पण या संस्थेचे सभापती अजय सावंत यांच्या हस्ते झाले.

माथेरान नागरी सहकारी पतसंस्थेच्य आवारात संस्थेचे एटीएम सुरू असून माथेरान दस्तुरी नाका येथेदेखील अजून एक एटीएम सुविधा लवकरच सुरू करणार असल्याचे या वेळी सावंत यांनी सांगितले. या संपूर्ण कार्यक्रमावेळी संस्थेचे सभापती, उपसभापती, सदस्य, तज्ञ संचालक आदी मान्यवर मंडळी तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



पेण : रायगड जिल्हा ज्वेलर्स असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांनी जिल्हा पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांची सदिच्छा भेट घेतली. या वेळी असोसिएशनचे अध्यक्ष राकेश जैन, कन्हैय्या पुनमिया, उपाध्यक्ष मुकेश मेहता, खजिनदार प्रभाकर म्हात्रे आदी पदाधिकारी उपस्थित होते.

# दहावी, बारावीमध्ये प्रथम आलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार

## कर्जत तालुक्यात आगरी समाजाचा उपक्रम

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील विविध माध्यमिक शाळा आणि कनिष्ठ महाविद्यालयात दहावी आणि बारावीमध्ये प्रथम क्रमांक मिळविणाऱ्या आगरी समाजातील विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. आम्ही आगरी ग्रुपकडून या विद्यार्थ्यांचा त्यांच्या घरी जाऊन त्यांच्या पालकांच्या उपस्थितीत सत्कार केला जातो आणि हा उपक्रम गेली काही वर्षे सुरू आहे. दरम्यान तालुक्यात आगरी समाजातील १८ विद्यार्थी त्यांच्या माध्यमिक शाळेत आणि कनिष्ठ महाविद्यालयांत प्रथम आले आहेत.



आम्ही आगरी ग्रुप कडून दहावीच्या परीक्षेत त्यांच्या शाळेत प्रथम क्रमांक मिळविल्या असलेल्या १२ विद्यार्थ्यांना त्यांच्या घरी जाऊन सन्मानित करण्यात आले. तर बारावी मध्ये सहा विद्यार्थ्यांनी आपल्या कनिष्ठ महाविद्यालयात प्रथम क्रमांक मिळविला आहे. त्यांचा देखील त्या विद्यार्थ्यांच्या घरी जाऊन सन्मानित करण्यात आले. आम्ही आगरी ग्रुपने विविध माध्यमिक शाळा आणि कनिष्ठ महाविद्यालयात प्रथम क्रमांक भडवळ गावात तीन विद्यार्थ्यांचा तसेच माळेवाडी तेथील दोन तर नेरळ खांडा, नेवाळी, तळवडे, वंजारपाडा, पोशीर, माले, खांडस, पाथरज, चांधई, उमरोली, बारणे, बीड आणि कर्जत शहर येथील प्रत्येकी एका विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. आम्ही आगरी ग्रुपचे केशव मुने, संदीप म्हसकर, मनीषा दळवी, किशोर घारे, अंकुश शेळके, मिलिंद विरले, मनोहर हजारे, ॲड श्रीकृष्ण डुकरे, शिवाजी कराळे, संतोष पेरणे, सुभाष नाईक, महेश भगत, सुभाष नाईक, देविदास कोळंबे, ॲड विपुल हिसालके, कैलास थेर, सज्जन गवळी, संतोष कोळंबे,आदी सदस्य सहभागी झाले होते. या सत्कार सोहळ्याचे दरम्यान मुख्याध्यापक गंगावणे, चित्रकार रामदास लोभी, माजी उप सरपंच आदेश धुळे, माजी सदस्य बाबुराव माळी, सामाजिक कार्यकर्ते आत्माराम घोडविंदे, राजेंद्र विरले,माळी, सायकलपटू गजानन डुकरे, विलास भागीत आदी देखील सहभागी झाले.

# अंजली कांबळे यांचा स्मृतिदिन

**पेण : प्रतिनिधी**

पीआरपीचे रायगड जिल्हा अध्यक्ष सीताराम कांबळे यांच्या सुविद्य पत्नी माजी मुख्याध्यापिका तथा आदर्श शिक्षिका पुरस्कार प्राप्त दिवंगत अंजली सीताराम कांबळे यांचा प्रथम स्मृतिदिन पीआरपीचे संस्थापक अध्यक्ष जोगेंद्र कवाडे यांच्या प्रमुख उपस्थितीत पेणमधील गोपाळकृष्ण हॉल येथे झाला.



या वेळी बोलताना पीपल्स रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा माजी खासदार प्राध्यापक जोगेंद्र कवाडे यांनी माई म्हणजेच दिवंगत अंजली कांबळे या आपले कुटुंब, आपले शेजारी, शालेय कार्यकाळातील सहकारी आणि सामाजिक संघटनेचे काम करत असताना अष्टपैलू नेतृत्वाच्या माध्यमातून भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची चळवळ बालपणापासूनच आपल्यात रुजवून ती कायम ठेवली याची आठवण करून दिली.

यावेळी पेणच्या माजी नगराध्यक्षा प्रितम पाटील, माजी नगरसेवक पांडुरंग जाधव, यशवंत वाशीकर, नाना सुर्वे गुरुजी, अँड, प्रमोद कांबळे, भीमसेन शिंदे, यशवंत शिंदे सर, भूपेंद्र चवादकर, विद्यार्थी संघटना अध्यक्ष नागेश सुर्वे, सुनिल धामणकर, जी एम पाटील, सुनील साळवी, नंदा म्हात्रे, देवेंद्र कोळी, प्रभाकर घायतळे, समीर घायतळे यांसह अंजली कांबळे यांचे कुटुंबीय आणि हितचिंतक तसेच नातेवाईकांनी अभिवादन करून श्रद्धांजली अर्पण केली.

# वर्षासहलीसाठी फणसाड डॅमला पर्यटकांची पसंती

**रेवदंडा : प्रतिनिधी**

डोंगर कपार्यातील वाहणाऱ्या धबधब्याखेरीज धरणातील धावणारे पाणी अंगावर घेण्यासाठी आतुरलेली युवा मंडळी वर्षा सहलीचे प्लनिंग करतात. मुरूड तालुक्यातील फणसाड अरण्मातील फणसाड डॅमला तरूणाईच्या उत्साहाचा बहर वर्षा सहलीच्या निमित्ताने पहावयास मिळतो.



फणसाड धरणातून बोर्ली पंचक्रोशीतील बावीस गावांना पाणी पुरवठा करते. शासनाच्मा पाटबंधारे विभाग कोलाडच्या अखत्मारीत हे धरण असल्माचे सांगितले जाते, परंतू नजीकच्मा भोईघर ग्रामपंचामतीच्या हद्दीत असलेल्मा फणसाड धरणाचा सोमरेसुतक नसल्याचे मेथील ग्रामस्थांनी सांगितले. त्यामुळे ग्रामपंचामतीमार्फत मेथे वर्षासहली प्रेमी मंडळीसाठी सुविधा पुरविल्या जात नाही असे म्हटले जाते.

फक्त पावसाळी फणसाड डॅमला वर्षा सहलीच्या निमित्ताने मोठी गर्दी होते, मात्र अनेक सुविधाचा अभाव मेथे आढळतो, बाहेरून वर्षा सहलीसाठी येणाऱ्या मंडळीना रस्तावर कुठेही मार्गफलक नसल्याने चुकीच्या मार्गाने जात नाही ना, अशी शंका मनात घेऊनच पुढे सरकावे लागते. रस्तावरून जाणाऱ्या ग्रामस्थांना फणसाड डॅम कुठे हा प्रश्न पावसाळी नित्माचा प्रश्न कोणीही सोडविण्माचा प्रमत्न केला जात नाही. फणसाड डॅमकडे जाणाऱ्या वर्षा सहली मंडळीचे परिसरातील स्थानिक ग्रामस्थांना सोमरसुतक नाही, मात्र फणसाड धरणानेच मेथील शेतीचे सोने झाले असून पावसाळा व्यक्तीरिक्त उन्हाळी शेती डोंगर कपारीत वसलेल्या भोईघर, काजुवाडी, व बेलवाडी परिसरातील गावातून घेतली जाते. शिवाम धरणाचे पाण्याने मेथील परिसरात सुपारीच्या बागा शिवाय भाजीपालासुध्दा घेतला जातो.

वर्षासहलीना येणाऱ्या मंडळीसाठी एकही दुकान अथवा पिण्माच्मा पाण्माची सुध्दा सोम रस्ताने जाताना होत नाही. बेलवाडी व काजूवाडी मेथून फणसाड धरणाच्या डॅमकडे डोंगरातून कच्चा रस्ताने जावे लागते, डोंगरात असल्माने पक्का रस्ता पावसाच्या पाण्याने नित्माने वाहून जातो, परंतू तरीही रस्ता जाणे-मेणे करीता सुमोग्म बनविले असते तर भोईघर ग्रामपंचामतीस वर्षा सहलीच्या निमित्ताने फणसाड डॅमसह भोईघर, काजुवाडी व बेलवाडी गावाना भेटी देणाऱ्यांची दुवा निश्चित मिळेल.

फणसाड डॅमला वर्षा सहलीच्या निमित्ताने तरूणाईची मोठी पंसती आहे. पावसाळयात दर शनिवार तसेच रविवारी मोठी गर्दी पहावमास मिळते. डोंगर कपारीत वसलेल्या निसर्ग सोदर्माची मुक्त हस्ते उधळण असलेल्या परिसर मुवा वर्गाला भावतो, मनमोकळेपणानी एक वेगळा आनंद मिळविता मेतो. धरणातून वाहून जाणाऱ्या पाण्यात ओलेचिंब भिजत बसण्याची मज्जा काही औरच असते.

### *सुरक्षिततेचे कवच गरजेचे*

***नेहमीच दगदगीच्मा जीवनातून वनडे पिकनिक म्हणून फणसाड डॅमचे महत्व पावसाळ्यात दिवसेंदिवस वाढत आहे. पुढे सुविधाची उपलब्धता होईलच, परंतू तरूणाईच्या उत्साहाला सुरक्षितेचे कवच फारच जरूरीचे आहे. नाहीतर फणसाड डॅमच्या वर्षा सहलीना गालबोट लागू शकेल, मात्र फणसाड डॅमचे वर्षा सहलीचे महत्व वाढावे हीच नित्माची सर्वाची सदिच्छा असेल.***

# फार्मसी महाविद्यालयात योग दिन

**कर्जत : प्रतिनिधी**

कोंकण ज्ञानपीठ राहुल धारकर फार्मसी महाविद्यालयात सोमवारी (दि.२३) योग दिनाचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थिती दर्शवून उत्स्फुर्त प्रतिसाद दिला.

प्रमुख पाहुणे योग गुरु सोनोने उपस्थित होते. तसेच एन.बी. जुन्नरकर, संगीता महाजन, सरिता कंटे आदी उपस्थित होते.

प्राचार्य डॉ. मोहन काळे यांनी उपस्थितांचे स्वागत करत प्रास्ताविक भाषणात योग दिनाचे महत्त्व स्पष्ट केले. योग शिक्षिका सरिता कंटे यांनी योगासने व प्राणायामाचे प्रात्यक्षिक करून दाखवत त्याचे योग्य तंत्र शिकवले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रा. अक्षता गीध व प्रा. सिद्धिका ढोपे यांनी केले.

या वेळी डॉ. रुपाली येवले, डॉ. अतुल त्रिपाठी, प्रा. प्रिया खापे, प्रा. वैष्णवी काळे, महेश म्हात्रे, निकेत मांडवळे, निशिकांत मोधळे, अर्जुन गोरखा आदी उपस्थित होते.



# तिलक वर्माचा शतकी धमाका

**लंडन : वृत्तसंस्था**

भारतीय संघातील युवा क्रिकेटर तिलक वर्मा आणि इशान किशन यांनी इंग्लंडमधील काउंटी चॅम्पियनशिप स्पर्धेत अगदी धमाक्यात पदार्पण करून लक्ष वेधून घेतले आहे. हॅम्पशायरकडून एसेक्सविरुद्धच्या सामन्यात तिलक वर्माने इंग्लंडमधील काउंटी क्रिकेटमध्ये पदार्पणात शतकी डाव साधला आहे. याशिवाय ईशान किशन यानेही या स्पर्धेत खास छाप सोडली आहे.

२२ वर्षीय तिलक वर्माने छोट्या फॉर्मेटमध्ये अर्थात टी-२० क्रिकेटमध्ये मोठा धमाका करुन दाखवला आहे. आता इंग्लंडमधील काउंटी क्रिकेटमध्ये तो रेड बॉल क्रिकटमध्ये आपली भात्यातील धमक दाखवून दिलीये. चौथ्या क्रमांकावर फलंदाजी करताना तिलक वर्माने २३९ चेंडूत प्रथम श्रेणी क्रिकेटमधील सहावे शतक साजरे केले. दक्षिण आफ्रिकेचा ऑफस्पिनर सायमन हार्मरने याने त्याची विकेट घेतली. इशान किशन याने २४१ चेंडूत ११ चौकार आणि तीन षटकारांच्या मदतीने १०० धावांची खेळी केली.

हॅम्पशायर संघाने ३४ धावांवर दोन विकेट्स गमावल्यावर तिलक वर्मा फलंदाजीसाठी मैदानात उतरला होता. संघ अडचणीत असताना दबावात त्याने मैदानात तग धरून खेळताना २३९ धावांत शतक पूर्ण केले. टी-२० क्रिकेटनंतर मोठ्या फॉर्मेटमध्ये खेळण्यासाठीही तयार असल्याचे संकेतच या भारतीय युवा क्रिकेटरने इंग्लंडमधील आपल्या क्लास इनिंगमधून दिले आहेत.

## इंग्लंडच्या मैदानात इशान किशनचाही जलवा



भारतीय विकेटकीपर-बॅटर ईशान किशन याने नॉटिंघमशायर संघाकडून काउंटी क्रिकेटमध्ये धमाकेदार पदार्पण केल्याचे पहायला मिळाले. त्याने पदार्पणाच्या सामन्यात १२ चौकार आणि एक षटकाराच्या मदतीने त्याने ८७ धावांची खेळी केली. त्यालाही शतकी खेळीची संधी होती, पण डॉम बेसने त्याची विकेट घेतली.

# तळाघर कबड्डी संघाचा कसून सराव

**धाटाव : प्रतिनिधी**



रोहा तालुक्यातील तळाघर कबड्डी संघ पावसाळी मोसमी हंगामात चांगली कामगिरी करण्यासाठी उतरला आहे. दररोज एक ते दोन तास खेळाडू कसून सराव चिखलात करत आहेत.

धाटाव पंचक्रोशीसह तालुक्यात चांगल्या पद्धतीने खेळाचे प्रदर्शन तळाघर कबड्डी संघ करत आहे. या संघामध्ये १७ ते २२ या वयोगटातील खेळाडू असून उद्याच्या भविष्यासाठी एकीचे बळ दाखवत नियमित धावणे, वर्कआऊट करणे, व्यायाम करणे तसेच शिस्तीचा व प्रेक्षणीय खेळ कसा होईल या अनुषंगाने संघाचे सर्व खेळाडू अविरतपणे मेहनत घेत आहेत.

गतवर्षी तळाघर संघाने उत्तम कामगिरी केली होती. जिल्ह्यात मुरूड, अलिबाग, पेण, रोहा येथे खेळाचे चांगले प्रदर्शन पहायला मिळाले होते. आगामी किशोर व कुमार गट निवड चाचणी स्पर्धांमध्ये दमदार कामगिरी करू, असा विश्वास खेळाडूंनी व्यक्त केला आहे.

# शतकवीर ऋषभ पंतला आयसीसीने फटकारले

## पंचांसमोर नाराजी व्यक्त करणे भोवले!

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

टीम इंडियाचा धडाकेबाज यष्टीरक्षक फलंदाज ऋषभ पंत याने इंग्लंडविरुद्ध अप्रतिम फलंदाजी केली. आयपीएलमध्ये अपयशी ठरल्यानंतर पंतने लीड्स कसोटीच्या दोन्ही डावात शतके ठोकली. या डबल धमाक्यानंतरही पंतला आयसीसीकडून ओरडा बसला.

टीम इंडियाचा धडाकेबाज यष्टीरक्षक फलंदाज ऋषभ पंत याने इंग्लंडविरुद्धच्या पहिल्या कसोटीत दोन्ही डावात शतके ठोकली. पंतने पहिल्या डावात १३४ आणि दुसऱ्या डावात ११८ धावा केल्या. दोन्ही डावात शतके झळकावून ऋषभ



पंतने इतिहास रचला, पण त्याला ओरडा खावा लागला.

इंग्लंडच्या पहिल्या डावातील ६१व्या षटकात पंचांनी चेंडूचा आकार तपासल्यानंतर चेंडू बदलण्यास नकार दिला. यावर पंतने पंचांसमोर नाराजी व्यक्त केली तसेच तेथेच चेंडू जमिनीवर फेकून आपला निषेध व्यक्त केला. या चुकीमुळे पंतला फटकारण्यात आले.

मैदानावरील पंच पॉल रायफल आणि ख्रिस जाफनी यांनी पंतच्या निषेधाबद्दल मॅच रेफरीकडे तक्रार केली होती. त्यांच्याशिवाय थर्ड अंपायर शरफुदुल्लाह आणि फोर्थ अंपायर माइक बर्न्स यांनीही आरोप केले. पंतने या प्रकरणात मॅच रेफरी रिची रिचर्डसन यांच्याकडे आपली चूक मान्य केली.

आयसीसीच्या आचारसंहितेचे उल्लंघन पंत केल्याबद्दल लेव्हल १ अंतर्गत दोषी आढळला. त्यानंतर मॅच रेफरीने त्याला फटकारले आणि समज देऊन सोडून दिले. आससीने जारी केलेल्या प्रेस रिलीजमध्ये असे सांगण्यात आले की, पंत कलम २.८ अंतर्गत दोषी आढळले आहे, जे आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये पंचांच्या निर्णयाचा निषेध किंवा आक्षेप घेण्याशी संबंधित आहे. या आचारसंहितेचे उल्लंघन केल्याबद्दल पंतच्या खात्यात १ डिमेरिट पॉइंटदेखील जोडण्यात आला आहे.

# माजी क्रिकेटपटू दिलीप दोशी यांचे निधन

**मुंबई : प्रतिनिधी**

भारताचे माजी फिरकी गोलंदाज दिलीप दोशी यांचे सोमवारी रात्री हृदयविकारामुळे निधन झाले. १९४७मध्ये जन्मलेल्या दोशी यांनी वयाच्या ७७व्या वर्षी लंडनमध्ये अखेरचा श्वास घेतला.

अलीकडेच बीसीसीआयने एका समारंभात दोशी यांचा सन्मान केला होता. या महिन्याच्या सुरुवातीला लॉर्ड्स क्रिकेट मैदानावर झालेल्या वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपच्या अंतिम सामन्यातही ते उपस्थित होते. क्रिकेट कारकिर्दीनंतर एक यशस्वी हिंदी समालोचक म्हणूनही ते लोकप्रिय होते.

# सौरव गांगुलीच्या बायोपिकमध्ये दिसणार राजकुमार राव

**मुंबई : प्रतिनिधी**

भारतीय क्रिकेट संघाचा माजी कर्णधार आणि बीसीसीआयचा माजी अध्यक्ष सौरव गांगुली याचा बायोपिक मोठ्या पडद्यावर येणार आहे. अभिनेता राजकुमार राव गांगुलीची भूमिका साकारताना दिसणार आहे तसेच इतर स्टारकास्टही फायनल करण्यात आली आहे. राजकुमार यासाठी योग्य आहे, असे स्वत: गांगुलीनेच प्रतिक्रिया दिली, तर आता राजकुमारनेही यावर शिक्कामोर्तब केले आहे.



'एनडीटीव्ही'ला दिलेल्या मुलाखतीत राजकुमार राव म्हणाला, हो, मी सौरव गांगुलीचा बायोपिक करत आहे. मी लहानपणापासून क्रिकेट खेळत आलोय. खूप मजा येणार आहे. नक्कीच ही आव्हानात्मक भूमिका असणार आहे. त्यामुळे मी थोडा नर्व्हस आहे, पण त्यापेक्षा जास्त उत्साहित आहे. गांगुलीच्या क्रिकेट करिअरमधील अनेक ऐतिहासिक क्षण पडद्यावर पाहायला मिळतील यासाठी क्रिकेटप्रेमी आता उत्सुक आहेत. लॉर्ड्सवर गांगुलीने शर्ट काढून केलेले सेलिब्रेशन तर क्रिकेटप्रेमींच्या आजही लक्षात आहे.

राजकुमार रावने त्याच्या करिअरमध्ये याआधीही अनेक बायोपिक केले आहेत. 'श्रीकांत', 'शाहिद', 'अलीगढ', 'ओमेर्ता और चिट्टगोंग', 'बोस' या सिनेमांचा समावेश आहे, तर आता तो सहावी बायोपिक करायला जात आहे. ॲड. उज्वल निकम यांच्यावर आधारित बायोपिकवरही त्याच्याशी चर्चा सुरू आहे, असे तो म्हणाला.

राजकुमार राव आगामी 'मालिक' सिनेमात कधीही न पाहिलेल्या अशा अँग्री आणि ॲक्शन अवतारात दिसणार आहे. मानुषी छिल्लक मुख्य अभिनेत्री आहे.

# मांजरेकरांची जीभ पुन्हा घसरली!

## आता दिनेश कार्तिकबद्दल अपमानास्पद टिप्पणी

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

हॉटस्टार मॅच सेंटर लाइव्ह ऑडिओमधील तांत्रिक चुकीमुळे टीम इंडियाचे माजी क्रिकेटपटू आणि समालोचक संजय मांजरेकर यांनी माजी क्रिकेटपटू दिनेश कार्तिकबद्दल केलेली अपमानास्पद टिप्पणी चव्हाट्यावर आली आहे. मांजरेकरांनी यापूर्वी रवींद्र जडेजा, इरफान पठाण, मोहम्मद शमी यांच्याबद्दल वादग्रस्त विधाने केली होती. आता या यादीत दिनेश कार्तिक या नावाची भर पडली आहे.

माजी क्रिकेटपटू आणि समालोचक संजय मांजरेकर यांनी दिनेश कार्तिकबद्दल अत्यंत अनादराने उल्लेख केला. दिनेश कार्तिकची पत्नी टेनिसपटू असल्यामुळे तो सामना पाहत असेल, असा अंदाज बांधत मांजरेकर म्हणाले, ये **** देखता होगा. त्यानंतर त्यांनी, त्याची पत्नी टेनिसपटू आहे का, अशी विचारणाही त्यांनी केली आहे.

मांजरेकरांनी केलेली अपमानास्पद टिप्पणी कॅमेऱ्यात कैद झाली असून रेडिट सोशल मीडिया फ्लॅटफॉर्मवर व्हायरल होताच त्यांच्यावर टीका होत आहे. अनेकांनी या टिप्पणीबद्दल मांजरेकरांनी माफी मागावी, अशी मागणी केली आहे.

















दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. -मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, मुख्य संपादक : देवदास मटाले. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com